दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –२०५ रविवार,दि.३० मार्च २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-205 Sunday, Dt.30 March 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# मोदी सरकारने आणलेल्या योजनांमध्ये मुस्लीम नाहीत का?

## 'सौगात-ए-मोदी'वर टीका करणाऱ्या विरोधकांना एकनाथ शिंदेंचा सवाल

रमजान महिन्यानिमित्त भाजपकडून सौगात-ए-मोदी मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत विशेष किट दिले जात आहे. या किटमध्ये कपडे आणि खाद्यपदार्थ आहेत. मात्र, भाजपच्या सौगात-ए-मोदी किटवरून विरोधकांकडून टीका केली जात आहे. एकीकडे मुस्लीम विरोधी भूमिका भाजप घेते आणि दुसरीकडे सौगात ए मोदी कीट वाटत आहे, अशी टीका विरोधक करत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सौगात-ए-मोदी वर आपली भूमिका मांडली. तसेच मोदी सरकारने आणलेल्या योजनांमध्ये मुस्लीम नाहीत का? असा सवाल टीका करणाऱ्या विरोधकांना केला आहे. ते शनिवारी पुण्यात माध्यमांशी बोलत होते.

नेमके काय म्हणाले एकनाथ शिंदे?

एकनाथ शिंदे म्हणाले, आधी ही माहिती घ्या की, जे बोलणारे आहेत; त्यांनी लोकसभा निवडणुकीत कसे वर्तन केले? कसे फेक नॅरेटिव्ह पसरवले. आरक्षण जाणार, संविधान बदलणार. मुस्लिमांमध्ये भीती तयार केली. सगळं काही केलं गेलं. संविधान धोक्यात आहे, असे म्हटले गेले. पण, तेच लोक आज मोदीजींवर आरोप करत आहेत.मोदीजींनी 35 कोटी जनतेला दारिद्र्य रेषेतून वर आणले. 80 कोटी लोकांना मोफत रेशन देतात. लखपती दीदी योजना आहे. ड्रोन दीदी योजना आहे. जन धन योजना आहे. त्यात काय फक्त हिंदू आहेत का? त्यात मुस्लीम नाहीत का? असा सवाल एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना केला. कोणताही भेदभाव नाहीये. जितक्या काही योजना आहेत, त्या सगळ्या योजना सर्व समाजासाठी, सर्व धर्मांच्या लोकांना मिळतात. त्यामुळेच तर त्यांच्या पोटात दुखत आहे. लोकसभेपासून त्यांचे पोट दुखत आहे. सगळी गडबड झाली आहे, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर केली.



“ उद्धव ठाकरे : 'बटेंगे तो कटेंगे' हा नारा देणारे आता 'सौगात ए मोदी' म्हणत आहेत. पण ही योजना 'सौगात ए मोदी' नाही तर 'सौगात ए सत्ता' असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली होती. जे लोक आमच्या हिंदुत्त्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत ते आता काय म्हणतील. भाजपने आता आपण हिंदुत्व सोडल्याची घोषणा करावी, असे उद्धव ठाकरे म्हणाले होते.

“ प्रकाश आंबेडकर : वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी रक्तात माखलेले 'सौगात-ए-मोदी अशा प्रकारे या किटचे वर्णन केले. सौ चूहे खाकर बिल्ली हज को चली' या वाक्याचा प्रत्यय येत आहे. मोदी 32 लाख मुस्लिम बांधवांना या रमजानच्या शुभेच्छा देत आहेत. मात्र मुस्लिमांनो, जागे व्हा आणि मित्र आणि शत्रू मधील फरक ओळखा, असे आवाहन देखील आंबेडकर यांनी केले.

“ संजय राऊत : सौगात-ए-मोदीमुळे अनेकांची गोची झाली आहे. भाजपमधील काही लोकांना देशातील मुस्लिमांचे अस्तित्व मान्य नाही. त्यांना असे वाटते की मुस्लिमांनी या देशात राहूच नाही. मुस्लिम क्षत्रू आहेत त्यांना काही अधिकार नाही, असे वाटणाऱ्या लोकांनी मोदीकी

### भाजपची सौगात-ए-मोदी मोहीम काय?

भाजपने रमजान महिन्यानिमित्त सौगात-ए-मोदी मोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत, देशभरातील 32 लाख वंचित मुस्लिमांना ईद साजरी करण्यासाठी विशेष किट दिली जात आहेत. भाजपच्या अल्पसंख्याक आघाडीने या मोहिमेची जबाबदारी घेतली आहे. देशातील 32 हजार मशिदींसह भाजपच्या अल्पसंख्याक आघाडीचे 32 हजार कार्यकर्ते गरजूंना हे किट पोहोचवतील. यासाठी प्रत्येक मशिदीतील 100 लोकांना मदत करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सौगात-ए-मोदी किट मध्ये कपडे आणि खाद्यपदार्थ आहेत. यामध्ये महिलांसाठी सूट, पुरुषांसाठी कुर्ता-पायजमा, डाळी, तांदूळ, शेवया, मोहरीचे तेल, साखर, कपडे, सुकामेवा आणि खजूर यांचा समावेश आहे. प्रत्येक किटची किंमत सुमारे 500 - 600 रुपये असल्याचे सांगितले जात आहे.

## नमो शेतकरी योजनेचा हप्ता लवकरच खात्यात जमा होणार

मुंबई : राज्यातील ९३.२६ लाख शेतकरी कुटुंबाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या सहाव्या हप्त्याचा सुमारे रक्कम रू. २१६९ कोटी लाभ आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात दि. ३१ मार्च पूर्वी जमा करण्यात येत आहे अशी माहिती कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेली प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजना अन्नदाता बळी राजाच्या उत्पन्न वाढीसाठी राज्यात सन २०२३-२४ पासून राबवण्यात येत आहे. प्रधानमंत्री यांच्या हस्ते माहे डिसेंबर २०२४, ते माहे मार्च, २०२५ या कालावधीतील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. या हप्ता वितरण सोहळ्यामध्ये राज्यातील एकूण ९२.८९ लाख शेतकरी कुटुंबाना रक्कम १९६७.१२ कोटी निधीचा लाभ वितरीत करण्यात आलेला आहे.

या व्यतिरीक्त त्यानंतरही केंद्र शासनाने पी.एम. किसान योजनेअंतर्गत एकूण ६५,०४७ लाभार्थींना लाभ दिला आहे. त्यानुसार राज्यातील ९३.२६ लाख शेतकरी कुटुंबाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा सहाव्या हप्त्याचा सुमारे २१६९ कोटी रुपये लाभ आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात दि. ३१ मार्च, २०२५ पूर्वी जमा करण्यात येत आहे.

## आयपीएस सुधाकर पठारे यांचे भीषण अपघातात निधन

नागरकुरलून : तेलंगणातील श्रीशैलम येथून नागरकुरलूनकडे जात असताना आयपीएस सुधाकर पठारे यांचे अपघाती निधन झालं आहे. देवदर्शनासाठी गेले असता पठारे यांच्या कारचा अपघात झाला आणि त्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघातात परभणी येथील कंत्राटदार भागवत खोडके यांचाही मृत्यू झाला आहे. हे दोघे ज्या गाडीतून प्रवास करत होते त्या गाडीची ट्रकसोबत धडक झाली आणि हा अपघात झाला. सुधाकर पठारे हे २०११ बॅचचे आयपीएस अधिकारी असून पठारे यांच्या निधनाने महाराष्ट्र पोलिस दलावर शोककळा पसरली आहे.

आयपीएस सुधाकर पठारे यांच्यावर सध्या मुंबई पोलिसात पोर्ट झोनचे डीसीपी म्हणून जबाबदारी



सोपवण्यात आली होती. पठारे हे काही काळापूर्वी ट्रेनिंगसाठी हैदराबादमध्ये गेले होते. तिथं त्यांच्या एका नातेवाईकासह ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी जात असताना हा अपघात झाला. अपघातात सुधाकर पठारे यांच्यासोबत त्यांचे नातेवाईक असलेल्या भागवत खोडके यांचाही मृत्यू झाला.

सुधाकर पठार हे स्पर्धा परीक्षा देत असताना १९९५ साली जिल्हा विशेष लेखा परीक्षक झाले. यानंतर १९९६ मध्ये विक्रीकर अधिकारी वर्ग म्हणून त्यांची निवड झाली. तसंच नंतर १९९८ साली पोलिस उपअधीक्षक म्हणून त्यांची निवड झाल्यानंतर पोलिस खात्यातच ते रमले. आतापर्यंत त्यांनी पोलिस उपअधीक्षक म्हणून पंढरपूर, अकलूज, कोल्हापूर शहर, राजुरा येथे काम केले आहे.

## एक एप्रिलपासून वीज बिलात 'सवलत'

मुंबई : राज्यातील घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक वीजग्राहकांना दिलासा मिळणार असून एक एप्रिलपासून वीजबिल कमी होणार आहे. राज्य वीज नियामक आयोगाने महावितरण, टाटा, अदानी व बेस्टसह अन्य वीज वितरण कंपन्यांचे नवीन वीज दर लागू करण्यास आयोगाने शुक्रवारी मध्यरात्री मंजुरी दिली. स्मार्ट मीटर (टीओडी) बसविणाऱ्या औद्योगिक, वाणिज्यिक ग्राहकांना सकाळी नऊ ते सायंकाळी पाच आणि रात्री बारा ते सकाळी सहापर्यंतच्या वीजवापरास १०-३० टक्के वीजदर सवलत मिळेल, मात्र सायंकाळी पाच ते रात्री १०-१२ वाजेपर्यंतच्या वीजवापरासाठी २० टक्के जादा मोजावे लागतील.



म्हणजे त्यांना एका हाताने दिलेला लाभ दुसऱ्या हाताने काढून घेतला जाईल. महावितरण व अदानी कंपनीचे वीजदर एक एप्रिलपासून सरासरी १० टक्के, टाटा कंपनीचा १८ टक्के तर बेस्टचा वीजदर ९.८२ टक्के कमी होईल. पुढील पाच वर्षात अपारंपारिक क्षेत्रातील सौर व अन्य स्वस्त वीज उपलब्ध होणार असल्याने वीजदर कमी होणार आहेत.

मात्र कृषीग्राहकांसाठी औद्योगिक, वाणिज्यिक व अन्य ग्राहकांवर पडणारा क्रॉस सबसिडीचा बोजा एक एप्रिलपासून पुढील पाच वर्षात टप्प्याटप्प्याने कमी करण्यात येणार आहे.

## राज्यात इलेक्ट्रिक वाहनं करमुक्त

मुंबई : राज्यात इलेक्ट्रिक वाहनांना (ईव्ही) चालना देण्यासाठी सरकार कटिबद्ध असून, याच दृष्टिकोनातून ईव्ही धोरणाचा स्वीकार करण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली. राज्यभरात चार्जिंग स्टेशनांचं जाळं मोठ्या प्रमाणावर विस्तारलं जात आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात 30 लाखांहून अधिक किमतीच्या ईव्ही वाहनांवर 6 टक्के कर लादण्याची घोषणा झाली होती, परंतु हा कर मागं घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय फडणवीसांनी विधान परिषदेत जाहीर केला.

किमान 80 टक्के वाहनं इलेक्ट्रिक

राज्यातील रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांपैकी किमान 80 टक्के वाहनं इलेक्ट्रिक असावीत, या ध्येयानं सरकार प्रेरित आहे. ईव्ही वाहनांचा वापर वाढल्यास प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## 'सेल्फी' काढून, फोटो घेऊन प्रश्न सुटत नाहीत

### सुप्रिया सुळेंचे नाव न घेता अजित पवारांनी फटकारले

पुणे : 'सेल्फी' घेऊन आणि फोटो काढून प्रश्न सुटत नसतात, त्यासाठी काम करावे लागते. कामातील ज्ञान असावे लागते, अधिकाऱ्यांवर दबदबा असावा लागतो, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खासदार सुप्रिया सुळे यांचे नाव न घेता त्यांना चांगलेच फटकारले.माळेगाव साखर कारखान्यावर आयोजित शेतकरी मेळाव्यामध्ये बोलताना पवार यांनी कारखान्याची निवडणूक नजीकच्या काळात लागण्याची शक्यता असल्याचे सूतोवाच केले, या मेळाव्यामध्ये निवडणुकीच्या अनुषंगाने पवारांनी विरोधकांवर केलेली फटकेबाजी पहावयास मिळाली. या वेळी पवार म्हणाले, अजित पवारांमुळे माळेगाव आणि सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांना कमी पैसे दिले असे विरोधक म्हणतात, परंतु सोमेश्वरचा ऊसदर काढताना मी माझे मत मांडतो, माळेगावचा ऊसदर काय निघतो? किती निघतो? हे मी पाहत नाही. माळेगावसह सोमेश्वर या दोन्हींचे मी नेतृत्व करतो, त्यामुळे मी कधीही चुकीच्या पद्धतीने वागून संस्था अडचणीत आणणार नाही. ज्यावेळी मला वाटेल की आता मला संस्था



चालवता येत नाही, त्यावेळी मी सभा घेऊन सांगेन की आता मला जमत नाही. बारामती तालुक्यासाठी केवळ मागील शंभर दिवसांत १००० कोटी रुपयांचा निधी आणला आहे, यामध्ये जानाई शिरसाई जलसिंचन योजना, शिक्षण क्षेत्रातील मोठे काम तर मूलभूत सुविधा आदींचा समावेश आहे. माझ्यासारखा आमदार तुम्हाला इथून पुढे मिळणार नाही. मी उपमुख्यमंत्री तसेच अर्थमंत्री आहे. तसेच सहकारमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचा आहे, त्यामुळे साखर कारखानदारीला मदत माझ्याकडूनच मिळणार आहे, असेही अजित पवारांनी ठणकावले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांचेही नाव न घेता अजित पवार म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांच्याशी माझी जवळीक आहे. केंद्रात किंवा राज्यात काही काम असेल तर ते माझ्यामार्फतच होईल. सहकार खात्यातील कामांबाबत इतर नेत्यांकडे फारसा प्रभाव नसल्याची टीका करत कारखान्याचा हजारो कोटींचा आयकर केवळ अमित शहा यांच्यामुळे माफ झाला, हे पूर्वी का झाले नाही? असा थेट सवाल करत त्यांनी अप्रत्यक्षपणे शरद पवारांवर टीका केली.

## म्यानमार भूकंपामध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या 1600वर


नवी दिल्ली: म्यानमार आणि थायलंडमध्ये शुक्रवारी आलेल्या भूकंपाने मोठा हाहाकार माजवला आहे. शनिवारीही भूकंपाचे झटके जाणवले. शनिवारी दुपारी भूकंपाची तीव्रता ५.१ रिश्टर स्केल इतकी होती. भारताने भूकंपाचा धक्का बसलेल्या म्यानमार आणि थायलंडच्या मदतीसाठी ऑपरेशन ब्रम्हा अंतर्गत मेडिकल टीम पाठवली आहे. म्यानारमध्ये भूकंपामुळे मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या १६४४ वर पोहोचली आहे.

भारताचे ऑपरेशन ब्रम्हा

म्यानमारमध्ये आलेल्या विनाशकारी भूकंपामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. भारत सातत्याने बचावकार्य करत आहे. भारताने संवेदना प्रकट करताना शक्य होईल तितके मदतीचे आश्वासन दिले आहे. भारताने ऑपरेशन ब्रम्हा अंतर्गत स्पेशल मेडिकल टास्क फोर्स बचाव कार्यासाठी तैनात केले आहे.

लेफ्टनंट कर्नल जगनीत गिलच्या नेतृत्वात ११८ सदस्यीय मेडिकल टीम म्यानमारसाठी रवाना झाली आहे. ही टीम एअरबोर्न एंजल्स टास्क फोर्सचा भाग आहे.

शुक्रवारी चीन, म्यानमार, थायलंड आणि भारतात भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. म्यानमारमध्ये पहिला भूकंप १२.५० वाजता आला. याची तीव्रता ७.७ रिश्टर स्केल इतकी होती. या भूकंपाचा केंद्रबिंदु म्यानमारच्या सागाईंग शहराच्या जवळ पृथ्वीच्या १० किमी खोल होता. युनायटेड स्टेटस जिओलॉजिकल सर्व्हेने सांगितले की १२ मिनिटांनंतर दुसरा भूकंप आला. याची तीव्रता ६.४ इतकी होती. या भूकंपानंतर म्यानमार आणि थायलंडमध्ये जनजीवत पूर्णपणे उद्ध्वस्त झाले.





# सणासुदीत विजेचा लपंडाव नको - धनंजय मुंडे यांच्या महावितरणच्या अधिकाऱ्यांना सक्त सूचना

## थकीत वीज बिलांचे कनेक्शन सणासुदीत कापू नका
## परळी मतदारसंघातील महावितरणच्या विविध कामांचा मुंडेंनी घेतला आढावा

परळी ।प्रतिनिधी

गुढीपाडवा, रमजान ईद आदी सणासुदीच्या दिवसांत परळी शहर व ग्रामीण भागातून विजेचा सातत्याने लपंडाव सुरू असल्याच्या तसेच काही भागात थकीत वीज बिलांसाठी कनेक्शन बंद केल्याच्या तक्रारी काही नागरिकांनी केल्या असून, ऐन सणासुदीच्या काळात विजेचा लपंडाव तातडीने थांबवून पूर्णवेळ वीज उपलब्ध करून द्यावी, अशा सक्तीच्या सूचना आज माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत त्यांच्या परळी येथील संपर्क कार्यालयात महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री. राजपूत यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. थकीत वीज बीलांचे कनेक्शन ऐन सणासुदीत कापू नयेत, त्याचबरोबर सणाच्या काळात सक्त वसुली बाबत गरजूंना थोडा अवधी वाढवून द्यावा, याबाबतही मुंडेंनी या बैठकीत सूचना केल्या. परळी मतदारसंघातील विविध प्रस्तावित व काम सुरू असलेल्या वीज उपकेंद्राच्या कामासह ट्रान्सफॉर्मर ची मागणी, पुरवठा यांसह परळी मतदारसंघातील महावितरणच्या विविध कामांचा आढावा यावेळी धनंजय मुंडे यांनी घेत अधिकाऱ्यांना योग्य सूचना केल्या.

यावेळी युवक नेते अजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, संचालक माणिकभाऊ फड, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, शिवसेना तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे, डॉ. संतोष मुंडे, कार्यकारी अभियंता श्री. चाटे, उपअभियंता श्री. राठोड यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.



## संपादकीय
# बालिश बाहुबली

महासत्ता म्हणवणाऱ्या अमेरिकेतील सत्ताधाऱ्यांचा हा उथळपणा एक दिवस हजारोंच्या किंवा लाखोंच्या जिवावर उठू शकतो...

राज्यशकट हाकणे ही गंभीर बाब असते. मोठ्या देशाचा गाडा हाकणे हे तर अधिक गंभीर. महासत्तेचा कारभार तर गंभीरात गंभीर. पण हे गांभीर्य नको तेथे नको तितके दाखवले गेले नि हवे तेव्हा व तेथे आढळून आले नाही, की काय होते हे अमेरिकेत नुकत्याच घडलेल्या प्रकाराने दाखवून दिले. डोनाल्ड ट्रम्प यांनी तिसऱ्यांदा अमेरिकी अध्यक्षपदाची निवडणूक लढवली नि ते दुसऱ्यांदा या पदावर निवडून आले. त्यांनी या अत्यंत महत्त्वाच्या पदावर एक कार्यकाळ व्यतीत केलेला आहे. तेव्हा अध्यक्ष म्हणून अमेरिकेचा कारभार चालवण्याचा त्यांना चार वर्षांचा अनुभव आहे. पण त्या वेळी जसे ते मनाने वॉशिंग्टनमध्ये कमी आणि फ्लोरिडातील त्यांच्या मौजप्रासादातील मेजवान्यांमध्ये आणि प्रासाद परिसरात गोल्फ खेळण्यात अधिक रमायचे, तसेच आताचे चित्र आहे.

किंबहुना अध्यक्ष म्हणजे एकापाठोपाठ एक अध्यक्षीय आदेशांवर सही करून मोकळे व्हायचे हा नवाच छंद त्यांनी या वेळी जोपासलेला दिसतो. यंदा त्यांच्या आजूबाजूला – फ्लोरिडात नि वॉशिंग्टनमध्ये – निराळा विरंगुळा म्हणून उद्योगरत्न इलॉन मस्क बागडताना दिसतात. व्हाइट हाऊसला तशी निवासी चतुष्पादांची मोठी परंपरा. पण ट्रम्प यांनी मस्करूपे द्विपादाची योजना करून ती हौसही भागवून घेतली म्हणायची. मस्क यांचा तेथील वावर अनंत काळ असतो. ओव्हल ऑफिस या व्हाइट हाऊसमधील अध्यक्ष दफ्तरी कामकाज वा पत्रकार परिषद सुरू असताना तेथे चतुष्पाद घुटमळत असल्याचे आजवर आढळून आले नव्हते. मस्क मात्र पिलावळीसकट व्हाइट हाऊसमध्ये जात-येत असतात. मंत्रिमंडळाच्या बैठकांना हजेरी लावतात. कोणी एखादा राष्ट्रप्रमुख भेटीस आला, की त्याच्या आजूबाजूला घुटमळतात. त्यांची पिलेही पाहुण्यांच्या अंगाखांद्यावर लडिवाळतात. तसे पाहता अमेरिकेतील अनेक सरकारी आस्थापना म्हणजे गोपनीयतेच्या तटबंद्याच. एरवी दुसऱ्या देशांच्या प्रमुखांचीही सुरक्षेच्या नावाखाली शरीर तपासणी वगैरे होत असेल.

मस्क यांच्यावर हे असले बंधन नाही. त्यामुळे हे महाशय कोणत्याही सरकारी कार्यालयांत बिनदिक्कत प्रवेशतात. नोकरकपात करायची म्हणून कार्यालयीन डिजिटल यंत्रणांमध्ये घुसखोरी करतात नि परस्पर कर्मचाऱ्यांना 'उद्यापासून घरी बसावे' असे कळवूनही टाकतात. कुण्या न्यायाधीशाने ट्रम्प यांच्या आदेशाला स्थगिती दिली, की त्याच्याविरुद्ध महाभियोग चालवण्याची भाषा करतात. कॅप- जम्पर- जीन्स अशा पेहरावात अध्यक्षांच्या आजूबाजूस अधिकृत कामकाजादरम्यान वावरतात. जेथे प्रत्येक द्विपाद नि चतुष्पादाची हजेरी सरकारदफ्तरी नोंदली जाते आणि काटेकोर तपासली जाते, तेथे ही मंडळी मॉलमध्ये असल्यासारखी बागडत असतात. ट्रम्प यांनी ६ जानेवारी २०२१ रोजी अतिशय उदात्त भावनेतून त्यांच्या असंख्य समर्थकांना कॅपिटॉल या अमेरिकी काँग्रेसच्या इमारतीची 'सहल' घडवून आणली. आता त्यांतील काहींनी तिकडे मोडतोड केली, पोलिसांना धक्काबुक्की केली हा काही ट्रम्प यांचा दोष नाही. त्या वेळी काँग्रेसमध्ये जो बायडेन यांच्या अध्यक्ष निवडीवर शिक्कामोर्तबाचे सोपस्कार पार पडत होते. लवकरच अशा जथ्याने येणाऱ्यांसाठी व्हाइट हाऊसची हिरवळही सामूहिक सहलीसाठी खुली करून दिली जाईल.

# पटेल नगरीत आजपासून रामकथा ज्ञानयज्ञ सोहळा

लातूर ।प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी शहरातील पटेल नगरीत गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर रामायणाचार्य ह.भ.प. महेशजी महाराज भांदर्गे महापूर यांच्या रामकथेस प्रारंभ होणार असून ही रामकथा रामनवमीपर्यंत चालणार आहे.पटेल नगर येथील श्रीराम हनुमान मंदीर येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी रविवार दि. ३० मार्च ते ५ एप्रिल २०२५ या दरम्यान दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सायंकाळी ५ ते ७ या दरम्यान हरिपाठ आदी धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. तसेच गेल्या ३२ वर्षांपासून सातत्याने साजरा करण्यात येणार्या राम जन्मोत्सवाचेही ६ एप्रिल २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त गुलाल उधळण्याचा कार्यक्रम होणार असून राम जन्मोत्सवानिमित्त ह.भ.प. रोहितजी महाराज पांचाळ यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. गुलाल उधळल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पटेल नगरीत संपन्न होणार्या रामकथा व ज्ञानयज्ञ सोहळ्याचा समस्त भावीक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मानूर येथील साहिल पठाणची भारतीय तटरक्षक दलामध्ये निवड



मानूर ।प्रतिनिधी

मानूर येथील सरदारखान पठाण यांचा मुलगा यांनी अतिशय जिद्द व चिकाटीने आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याचे अट्टहास केला होता व तो अट्टाहास साहिल पठाण याने भारतीय तटरक्षक दलामध्ये नियुक्त होऊन आपल्या आई-वडिलांची स्वप्न पूर्ण करत साहिल पठाण यांची भारतीय तटरक्षक दलामध्ये निवड झाली या निवडीबद्दल श्रीक्षेत्र नागनाथ देवस्थान जाहागीरदार मठ संस्थानचे मठाधिपती १०८ गुरू विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांनी सत्कार करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व मानूर पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने ही साहिल पठाण वर शुभेच्छाचा वर्षाव करण्यात आला अतिशय जिद्द व चिकटने साहिल पठाण यांनी यश संपादन केले या यशाबद्दल साहिल पठाणचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# विनायकराव पाटील गवळी यांचे दुःखद निधन

जाफराबाद ।प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातील खापरखेडा येथील विनायकराव नारायण गवळी वय वर्षे ७०यांचे दि.२९ मार्च शनिवार रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्यानं दुःखद निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात खापरखेडा स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित दोन मुले, मुलगी, भाऊ, पुतणे, नातवंडे असा मोठा. गवळी परिवार आहे.ते सुनिल व



प्रकाश गवळी यांचे वडील होते.त्यांचा रक्षा विसर्जनचा कार्यक्रम सोमवार दि. ३१ मार्च २०२५ रोजी सकाळी ९.०० वा. खापरखेडा येथे होईल.

# जि.प.प्रा. शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इतर परिसरातील शाळेसाठी आदर्श ठरेल : उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे**

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी शहरातील जि.प.प्राथमिक शाळा सरकारखोरी तांडा येथे २८ मार्च २०२५ गुरूवार रोजी सायंकाळी प्रथम वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या थाटामाटात संपन्न झाले. यावेळी शाळेतील चिमुकल्यांनी वेगवेगळ्या गाण्यांवर सदाबहार असे नृत्य सादर केले व उपस्थितांचे मने जिंकली. उपस्थित रसिक प्रेक्षकांनी यावेळी चिमुकल्यांवर पारितोषिकांचा वर्षाव केला. अतिशय सुंदर प्रकारे हे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दिपप्रज्वलन करून या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन वडवणीनगरीचे उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे म्हणाले आपल्या मुलांचे सप्तगुण ओळखा त्याला चालना द्या त्यामध्ये ते करियर करू शकतात वार्षिक संमेलनातून विद्यार्थ्यांच्या सप्त गुणांना चालना मिळते उसाकडे न वळता विद्यार्थ्यांना सुशिक्षित घडवा असे बोलून दोन-चार जनाचे उदाहरण देखील भाऊंनी दिले व शाळेला शुभेच्छा दिल्या.. या कार्यक्रमात विविध मराठी, हिंदी, बंजारा गीत, बंजारा नुत्य बालकलाकारांनी वैयक्तिक, सामुहिक नृत्य, नाटक, गीतगायन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक गिन्यानदेव राठोड, युवा नेते दत्तात्रय जमाले, जेष्ठ नागरिक हरी पवार जेष्ठ नागरिक रावसाहेब पवार, पत्रकार संभाजी लांडे, निलेश चव्हाण, केंद्रप्रमुख धनवे बापू, रोहिदास चव्हाण, बंकट काळे सर, पांडुरंग आडे, अंगत रेडी सर, रघुनाथ यादव सर, वाघमारे सर हे होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बंकट काळे सर यांनी तर उपस्थितांचे



आभार शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम राठोड सर यांनी मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व आजी माजी विद्यार्थ्यांनी परीश्रम घेतले.

# हिंदू नववर्षाचे स्वागत बाईक रॅलीने रणरागिणींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - सविता जैन,सोनल पाटील

बीड ।प्रतिनिधी

जानकीराम हिंदूरक्षा समिती आयोजित भक्ती-शक्ती जागृती कार्यक्रमाच्या अंतर्गत रामनवमी व नववर्ष स्वागत फेरीमध्ये महिला व मुलींची बाईक रॅलीचं आयोजन करण्यात आले आहे. रविवार दिनांक ३० मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता राजीव गांधी चौक येथून सुरू होणाऱ्या महिलांच्या रॅलीमध्ये महिलांनी मोठ्या संख्येने उस्फूर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन सविता जैन आणि सोनल पाटील यांनी केले आहे.





यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये महिला सहभागी होतात केवळ महिलांचीच ही बाईक रॅली आहे. त्यामुळे महिलांनी महिलांसाठी आयोजित केलेला हा खास कार्यक्रम महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन नववर्षाचे स्वागत करण्यासाठी दुपारी साडेतीन वाजता जिजामाता पुतळा राजीव गांधी चौक येथे दिनांक ३० मार्च २०२५ रविवार रोजी ही बाईक रॅली होणार आहे.बाईक रॅलीची सुरुवात राजीव गांधी चौकापासून काढणार. राजीव गांधी चौक - डिपी रोड (इडछड ऑफिस समोरून) - बस स्टँडच्या मागे - छत्रपती शिवाजी महाराज पुतळा - जालना रोड - साठे चौक - सुभाष रोड - सिटी पोलिस स्टेशन समोरून सारडा कॅपिटल पर्यंत काढणार.सकल हिंदू महिला व मुलींची बाईक रॅली मध्ये पारंपारिक वेशभूषेत साजरा होणारा हा बीड शहरातील सकल हिंदू समाजातील महिलांसाठी एक ऐतिहासिक पर्व सुरू होणार.महिलांना समाजात समान स्थान मिळावे,महिला सशक्तीकरण व सक्षमीकरण घडवून यावे,प्रत्येक स्त्री स्वावलंबी व्हावी,महिलांना कमी लेखू नये, यासाठी, आपल्या भगिनींना, मैत्रिणींना घेऊन या आणि या ऐतिहासिक क्षणाचा भाग बनावे. म्हणून गुढी पाडवाच्या पवित्र दिवशी बाईक रॅलीमध्ये बीडकरांना नारीशक्ती दाखवायची गरज आहे.म्हणून यासाठी बीड शहरातील महिलांनी व तरुणींनी बाईक रॅलीमध्ये तसेच भक्ती शक्ती जागृती कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन महिला दुचाकी फेरी प्रमुख सोनलताई पाटील (तेजस्विनी ग्रुप) आणि सविताताई जैन (सावीज् ब्युटी शॉपी) करण्यात येत आहे.

# सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भिमराव रेणके ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त

धर्माबाद(अशोक पडोळे)


तालुक्यातील येताळा येथील भुमिपुत्र भिमराव धोंडीबा रेणके यांचा जन्म ७ मार्च १९६७ रोजी येताळा येथे झाला, प्राथमिक हायस्कूल,एच.एस.सी. शिक्षण घेऊन १५ जुन १९९२ रोजी कुंडलवाडी पोलिस स्टेशन मध्ये पोलिस कॉन्सटेबल पदावर रुजू झाले.पुढे भोकर, उमरी, मुदखेड ,धर्माबाद येथे प्रमाणिक सेवा केली,तर उपविभागीय पोलिस कार्यालय धर्माबाद येथे जुन २०२४ मध्ये सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती करण्यात आली होती.वडील धोंडीबा रेणके व काका कोंडीबा रेणके हे सैन्यात एकनिष्ठ प्रमाणिक देश सेवा करून सेवानिवृत्त झाले त्यांचाच आदर्श घेऊन पोलीस म्हणून ३३ वर्षाच्या सेवा काळात नागरिक ,आरोपी यांच्या कुठल्याही अमिषाला बळी न पडता प्रमाणिक पणे सेवा करून ३१ मार्च रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय धर्माबाद येथून भिमराव रेणके वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्याबद्दल शहरांसह तालुक्यातील कर्मचारी, मित्र, नातेवाईक यांच्या कडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# कालिदास महाराज भोपे यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन

अंबड ।प्रतिनिधी

अंजुबाई संस्थान आन्वा ता.भोकरदन यांचे दि.२८/३/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता वृद्धापकाळाने वयाचे ९० वर्षी संभाजीनगर येथे निधन झाले. अंजुबाई संस्थान कल्लोळ तीर्थ क्षेत्र अन्वा येथे त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. श्री लक्ष्मीकांत महाराज यांचे उत्तराधिकारी म्हणून कालिदास महाराज गादीवर होते. संस्थानचा पुर्ण कारभार ते पाहात होते. त्याचा फार मोठा शिष्यवर्ग आहे. महाराज गेल्याची बातमी कळताच सर्व भक्तगण तसेच गावातील व पंचक्रोशीतील राजकीय क्षेत्रातील, तसेच आमदार संतोष पाटील दानवे आदींसह मान्यवर अंत्ययात्रेला उपस्थित होते. कालिदास महाराज भोपे पुजारी अंजुबाई संस्थान कल्लोळ तीर्थ क्षेत्र अन्वा यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली नातवंडे पतरुड असा फार मोठा परिवार आहे. आज ते अंजुबाई चरणी लीन झाले.





**धर्माबाद( अशोक पडोळे)**

**तालुक्यातील जि.प.प्रा.शाळा समराळा शाळेचा विद्यार्थी सुशांत रमेश अबुलकोड हा जवाहर नवोदय विद्यालयासाठी पात्र ठरला.१८ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावी वर्गाकरिता या निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये सुशांत ने कठोर परिश्रम घेऊन जिद्दीने हे यश संपादन केले.यासाठी त्याला यशोदीप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र धर्माबाद चे संचालक सूर्यवंशी व रामपुरे सरांचे मार्गदर्शन लाभले.तसेच जि.प.प्रा.शाळा समराळा चे शिक्षकांनी त्याचे अभिनंदन केले. सुशांत ने यशाचे श्रेय आपले आई-वडील व गुरुजन वर्गाला दिले.या यशाबद्दल यशोदीप कोचिंग क्लासेस च्या वतीने सुशांत चे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले. तालुक्यात सुशांतच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी केले नाथ सागराच्या भौतिक संरचनेचे निरिक्षण

## शैक्षणीक भेट : पाण्याचा दाब, दरवाजे, मातीचे यांत्रिकी आणि संरचनात्मक अखंडतेची घेतली माहिती



बीड । प्रतिनिधी

महाविद्यालयात पुस्तकी ज्ञान दिल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष त्या सामग्री बद्दल जावून घेण्याची उत्सुकता असते. त्यामुळे आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने शैक्षणीक भेटीच्या आयोजन केले जाते. आदित्य पॉलिटेक्निक च्या विद्यार्थ्यांनी जायकवाडी धरण पैठण येथे भेट दिली असता नाथ सागराच्या भौतिक संरचनेचे निरिक्षण केले. त्या दरम्यान धरणातील पाण्याचा दाब, दरवाजे, मातीचे यांत्रिकी आणि संरचनात्मक अखंडतेची इत्य भूत माहिती विद्यार्थ्यांनी संकलित केली. या शैक्षणीक भेटीमध्ये ४ प्राध्यापकासह ४० विद्यार्थी सहभागी झाले होते.

आदित्य पॉलिटेक्निक च्या विद्यार्थ्यांनी जायकवाडी धरण पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा, आदित्य पॉलिटेक्निक चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणीक भेट दिली. या वेळी महाविद्यालयातील प्रा. पी. डी. दुधाळ, जी. एम. खालापुरीकार, ए.आर. मुंडे, आर.एस. वरपे हे होते.

शैक्षणीक भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी मातीच्या बांधाच्या भौतिक संरचनेचे निरीक्षण केले. त्यामध्ये स्पिलवे, दरवाजे आणि तट बंध समजून घेतले. त्यांनी धरणाच्या रचनेच्या तत्वांबद्दल जाणून घेतले, ज्यात पाण्याचा दाब, मातीचे यांत्रिकी आणि संरचनात्मक अखंडता यासारख्या घटकांचा समावेश आहे. स्पिलवेची भूमिका समजून घेणे आणि जास्त पाणी प्रवाहाच्या वेळी ते धरणाचे संरक्षण कसे करतात तसेच टर्बाइन आणि जनरेटरचे ऑपरेशन आणि विजेचे प्रसारण याबद्दल जाणून घेतले. धरणातून सिंचनासाठी पाणी वितरीत करणाऱ्या कालवा प्रणालीचे विद्यार्थी निरीक्षण केले. त्याचप्रमाणे शेतीतील पाणी व्यवस्थापनाचे महत्त्व आणि पाण्याची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी धरणांची भूमिका जाणून घेतली. दुष्काळ, पूर नियंत्रण आणि जलसंवर्धन यासह जल व्यवस्थापनातील आव्हानांबद्दल जाणून घेतले. या भेटीमुळे विद्यार्थांना थेअरी आणि प्रॅक्टिकल अभ्यासातील अंतर कमी करून वर्गात शिकवलेल्या संकल्पनांची कल्पना आणि समजण्यास मदत होते.

जायकवाडी धरण हे गोदावरी नदीवर असलेले महाराष्ट्रातील छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामधील पैठण येथे आहे. या धरणाला नाथसागर देखील म्हणतात. उंच पातळीवर धरण बांधल्याने लांब कालवे असणे शक्य झाले. आणि त्यामुळे मोठ्या प्रदेशाला सिंचन सुविधा उपलब्ध झाली. यासाठीचा प्रकल्प प्रस्ताव १९६४ पर्यंत महाराष्ट्राच्या सार्वजनिक आयोगाचे सदस्य, प्रभारी सिव्हिल इंजिनिअर ए.ए. सिद्दीकी यांच्या देखरेखीखाली पूर्ण झाला.

१८ ऑक्टोबर १९६५ रोजी तत्कालीन पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी या धरणाची पायाभरणी केली. २४ फेब्रुवारी १९७६ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या धरणाचे उद्घाटन केले . ६० किलोमीटरची लांबी आणि दहा किलोमीटरची रुंदी इतका मोठा पसारा असलेल्या या नाथ सागराची आशिया खंडातलं सर्वात मोठं मातीचं धरण अशी ओळख आहे. जायकवाडी धरणाची तब्बल १०२ टीएमसी पाणीसाठ्याची क्षमता आहे. हे धरण एकदा पूर्ण भरलं तर दोन वर्षांच्या शेतीच्या पाण्याची आणि ४ वर्षांच्या पिण्याची पाण्याची सोय होते. म्हणून या धरणाला मराठवाड्याचा छोटा समुद्र समजला जातो. नाथसागरावर मराठवाड्यातील पाच जिल्हे अवलंबून असतात. छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी आणि नांदेड हे जिल्हे जायकवाडी धरणावर थेट अवलंबून आहेत. जायकवाडी धरणाला उजवा आणि डावा असे दोन कालवे आहेत. या कालव्यातून मराठवाड्यातल्या पाचही जिल्ह्यातील शेतीसाठी पाणी सोडलं जातं. यातल्या डाव्या कालव्याची लांबी ही तब्बल २०८ किलोमीटर आहे.



# मुखेडचा बा-हाळी नाका बनला दुर्गंधीचे माहेरघर, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड-नांदेड महामार्गावरील शहरातील बा-हाळी नाक्याजवळ गेल्या दहा-बारा दिवसांपासून नाली तुंबल्यामुळे नालीतील दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर वाहत असून या दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. मुखेडातील प्रशासन मात्र कुंभकर्णी झोपेत असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या दहा-बारा दिवसापूर्वी जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस पडला. या पावसामुळे मुखेड- नांदेड मार्गावरील शहरातील बा-हाळी नाका परिसरात मोठी नाली तुंबली असून नालीतील दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर वाहत आहे. या रस्त्यावरून दिवसभरात अनेक वाहनधारक जातात. या वाहनधारकांपैकी कोणीही प्रशासनाकडे याबाबत तक्रार करीत नाही. एवढेच नव्हे तर कांही राजकीय पक्षाचे छोटे- मोठे नेते या परिसरात राहतात;परंतु ते देखील या समस्येकडे गांभीर्याने पाहत नाहीत. विशेष म्हणजे बा-हाळी नाका परिसरात छोटे-मोठे अनेक दवाखाने आहेत.त्यात कांही बाल रुग्णालयाचा समावेश आहे. बाल रुग्णालयात उपचार घेण्यासाठी शहर आणि तालुक्यातील अनेक गावातील रुग्णबालक येत असतात. गेल्या कांही दिवसापासून या गटारगंगेचा बंदोबस्त करण्यासाठी सक्षम असलेले मुख्याधिकारी शहराला नाहीत. त्यामुळे मुख्याधिकारी पदाची जबाबदारी घेतलेले प्रभारी अधिकारी या समस्येकड गांभीर्याने पाहताना दिसून येत नाहीत. त्याचबरोबर राजकीय पुढाऱ्यांना देखील जनतेच्या आरोग्याशी कांही देणे घेणे असल्याचे दिसून येत नाही. ही गटारगंगा अशीच वाहत राहिली तर येत्या कांही दिवसात निश्चितपणे शहरातील आबालवृद्धांना वेगवेगळ्या आजारांना सामोरे जाण्याची जावे लागण्याची शक्यता आहे.



# गोदावरी नदीपात्रातून बेसुमार अवैध वाळू उपसा; १० दिवसांत १५ ते २० हजार ब्रास वाळू

# उत्खनन घरकुल लाभार्थी वंचीत

अंबड ।प्रतिनिधी

उपविभागीय अधिकारी पुलकित सिंग यांनी अंबड तालुक्यातील १० वाळू माफियावर तडीपारीची कारवाई केली होती. काहीं दिवस भूमिगत झालेले वळु माफिया उपविभागीय अधिकारी पुलकित सिंग सुट्टीवर गेल्यानंतर वाळु माफिया पुन्हा सक्रिय झाले आहे.वाळू तस्करांनी गत १० दिवसांत अंदाजे १५ ते २० हजार ब्रास अवैध वाळू उपसा नदीपात्र तुन करण्यात आला आहे.महसूल व पोलीस विभागाला मिळतोय का चंदा ? खुलेआम चालतोय वाळूचा गोरखधंदा महसूल व पोलिस प्रशासनाची याकडे डोळे झाक सुरू आहे.परिसरात विना परवाना अवैध वाळू वाहतूक बिनबोभाटपणे सुरू आहे. या होत असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहातुकीलाख जिम्मेदार कोण ? गोदावरी नदीपात्रातुन वाळु उपसा करून टीपरमध्ये भरतानाफुकटच्या वाळूला जादा दाम गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून त्याचा जादा दाम लावून विक्री करण्यात येत आहे. अवैध वाळू उपशामुळे शासनाचा मोठा महसूल बुडत आहे. एक ते दोन हजार रुपये ब्रास असलेल्या वाळूचा भाव आता पाच ते सहा हजार रूपये च्यावर गेला आहे. विविध शिवारांत उपसा होत आहे अंबड तालुक्यातील बळेगाव, आपेगाव, गोरी, शहागड ऊढाण पुलाजवळ, वाळकेश्वर, पावरवाला बुद्धक, आदी ठिकाणांहून अवैध पद्धतीने वाळू उपसा करण्यात आला आहे.याकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देतील का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे

# शेतीमध्ये ॲग्रो केमिकलच्या अतिवापरामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम– मा. धनंजय गुंदेकर

## बलभीम महाविद्यालयातील कृषी रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत प्रतिपादन



बीड ।प्रतिनिधी

आज शेतीमध्ये ॲग्रो केमिकलच्या भरमसाठ वापरामूळे माणसांच्या आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होत आहेत. कॅन्सर सारख्या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव मानवी जीवनावर पडत आहे. त्यासाठी ॲग्रो केमिकल व्यवस्थापन व त्याबद्दल जागरूकता असणे अत्यंत गरजेचे आहे तसेच शेती करत असताना रेशीम शेती हा एक बीड जिल्ह्यासारख्या शेतीप्रधान जिल्ह्याला वरदान ठरणारा व्यवसाय असून आज रेशीम उद्योगात बीड जिल्हा क्रमांक एकवर आहे. त्याचे कारण म्हणजे रेशीम शेतीला व उत्पादकाला रेशीम विक्रीतून उत्कृष्ट भाव मिळत असून त्यामधून नफा ही मिळत आहे त्यामुळे शेती करणे फायद्याचे ठरत आहे असे प्रतिपादन बीडच्या कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मा. धनंजय गुंदेकर यांनी केले. येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील कृषी रसायनशास्त्र विभागाच्या वतीने दि. २९ मार्च रोजी 'कृषी रसायनांच्या सुरक्षित आणि कार्यक्षम वापराबद्दल जागरूकता मोहिम' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी ते उदघाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.संतोष उंदरे होते. याप्रसंगी मा. धनंजय गुंदेकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, शेती व शेती संबंधित कार्यक्षेत्रात जसे अग्रोकेमिकल सल्लागार, कृषी सल्लागार, माती परीक्षक, पीकपाणी सल्लागार, सेंद्रिय शेती तज्ज्ञ अशा अनेक क्षेत्रात आपल्या ज्ञानाच्या जोरावर करिअरच्या संधी मिळवणे व त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहेत. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात प्राचार्य डॉ.संतोष उंदरे म्हणाले की, कृषी रसायनशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त केल्यानंतर नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. जसे की ॲग्रो इंडस्ट्री, फर्टीलायझर कंपन्या, कीटकनाशके, तणनाशके, उत्पादक काम करणाऱ्या कंपन्या अशा क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात करिअरच्या संधी उपलब्ध आहेत.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, बीएससी ॲग्री केमिस्ट असणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवीनंतर स्वतःच्या कृषी दुकानासाठी परवाना मिळवता येतो. पहिल्या सत्रात धनंजय गुंदेकर यांनी ॲग्रो केमिकल्स उपयुक्तता व वापर याबद्दल माहिती दिली व दुसऱ्या सत्रात त्यांनी रेशीम शेतीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष डॉ. महादेव साखरे यांनी विद्यार्थ्यांनी कृषी क्षेत्राकडे करिअरच्या संधी म्हणून पहावे असा सल्ला दिला . या कार्यशाळेचे सूत्रसंचालन व प्रास्ताविकातून आयोजनामागील भूमिका संयोजक आणि कृषी रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. एस. एस. सुरवसे यांनी मांडली. या कार्यक्रमाचे आभार डॉ. एस. बी. चौधरी यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.योगेश काळकुटे, कुलदीप साखरे, अजय डोळस यांनी सहकार्य केले. या कार्यशाळेसाठी कृषी रसायनशास्त्र विभागातील द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळेच्या शिक्षकांचा अभ्यास दौरा संपन्न




माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळेतील सर्वच शिक्षकांनी बंगलोर व कुप्पम येथे शैक्षणिक व विज्ञान केंद्रास भेट देऊन आपला अभ्यास दौरा यशस्वी केला.जिल्ह्यातील २२ शाळांची निवड पीएम श्री शाळेअंतर्गत करण्यात आली आहे.केंद्र शासनाच्या माध्यमातून या शाळांना विज्ञान व गणित या विषयांमध्ये मॉडेल स्कूल म्हणून तयार करण्यात येणार आहे.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील २२ शाळातील शिक्षकांना तीन टप्प्यांमध्ये या अभ्यास दौऱ्यासाठी सहभागी करण्यात आले. २२ मार्च ते २७ मार्च या कालावधीमध्ये शिक्षकांनी बेंगलोर येथील विश्वेश्वरय्या म्युझियम, नेहरू प्लॅनेटोरियम येथे मानवी जीवनास अतिशय उपयोगी ठरलेल्या विविध वैज्ञानिक यंत्र यांना हाताळण्याचे कौशल्य विज्ञान प्रदर्शनात भेट देऊन संपादन केले.याप्रसंगी गगनयान व आकाशातील गमती जमती या संबंधातील अंतराळ शो दाखवण्यात आला. श्री श्री रविशंकर यांच्या आश्रमात जाऊन तेथील वेद विज्ञान शैक्षणिक केंद्राचा अभ्यास केला. तेथील निसर्गात भरणारी बहुभाषिक शाळा पाहून सर्वच शिक्षक भारावून गेले. लालबाग येथील बोटॅनिकल गार्डन मधील तीनशे वर्षांपूर्वीचे पुरातन वृक्ष व बोन्साय गार्डन पाहून निसर्गाचा चमत्कार अनुभवण्यास मिळाला. त्याचप्रमाणे २५० एकर मध्ये पसरलेले व सुमारे ५००० वृक्षांची लागवड करण्यात आलेले कब्बन पार्क पाहण्यात आले.त्याचप्रमाणे कर्नाटक राज्याच्या विधान भवनाची अतिशय देखणी वास्तू बघण्यात आली.

आंध्र प्रदेश,कर्नाटक व तामिळनाडू या तिन्ही राज्याच्या सीमेवर वसलेले आंध्रप्रदेश मधील कुप्पम या शैक्षणिक केंद्राला भेट देऊन तेथील शैक्षणिक मॉडेल्सचा अभ्यास शिक्षकांनी केला. रामजी राघवन यांच्या माध्यमातून १९९९ पासून या ठिकाणी ज्ञानरचनावाद यावर आधारित विविध कला व विज्ञान,गणित लॅब विकसित करण्यात आल्या आहेत.आकाशातील तारा मंडळ व त्यावर आधारित फिल्म विद्यार्थ्यांना दाखवून त्यांची जिज्ञासा वाढवतात. विद्यार्थी व शिक्षक या शैक्षणिक केंद्रास भेट देऊन स्वतः सर्व प्रयोग करतात.

या अभ्यास दौऱ्याचे यशस्वी आयोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई चे प्राचार्य डॉ. इब्राहिम नदाफ,अधिव्याख्याता डॉ.योगेश सुरवसे,स्मिता कापसे, राजाराम टकले,डॉ.सुलक्षणा पवार यांनी केल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गरबडे यांनी आभार मानले.या महत्त्वपूर्ण अभ्यास दौऱ्यामध्ये शाळेतील सहशिक्षिका मंदा सारुक,संगीता राठोड,ज्योती कोडगीरकर,जयश्री लोणीकर त्याचप्रमाणे सहशिक्षक दिनकर वाघमारे,मधुकर मकसरे,बाळासाहेब सोनसळे,शरद नायबळ,राजकुमार सोनपसारे, नारायण भालशंकर,चंद्रकांत यादव बालासाहेब कांबळे,बालासाहेब जामकर या सर्वांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला.या सर्वांना अभ्यास दौऱ्यास जाण्यासाठी सहकार्य सुंदर काळे,संगीता शिंदे, अब्दुल शेख,सौदागर सर,मगर हिरा,गोरख उघडे यांनी केले.



# वागदतांडा येथे बंजारा समाजाच्या वतीने मंत्री संजय राठोड यांचा नागरी सत्कार संपन्न

दिग्रस-नेर-दारव्हा ।प्रतिनिधी

दारव्हा तालुक्यातील राजीव नगर (वागद तांडा) येथील ग्रामस्थांच्या वतीने मंत्री संजय राठोड यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना मंत्री संजय राठोड म्हणाले की,जनसेवा हीच माझी खरी ओळख आहे. कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना तुम्ही दाखवलेला विश्वास आणि दिलेले प्रेम यामुळेच मी पाच वेळा आमदार, चार वेळा मंत्री, पालकमंत्री होऊ शकलो. माझ्या सामाजिक आणि राजकीय प्रवासात तुमचे योगदान अमूल्य आहे. त्यामुळेच हा सन्मान मतदारसंघातील संपूर्ण जनतेला समर्पित करतो.लोकसेवेची ऊर्जा आणि नवे संकल्प घेण्याची प्रेरणा देणारा हा नागरी सत्कार मी कायम हृदयात जपेन आणि मतदारसंघाच्या तसेच जनतेच्या विकासासाठी सदैव कटिबध्द राहीन, असा शब्द मंत्री संजय राठोड यांनी यावेळी उपस्थित समाज बांधवांना दिला.

# श्री क्षेत्र रामतीर्थ मठ पेठबीड येथे रामनवमीनिमित्त रामविजय ग्रंथाचे आजपासून पारायण

## भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे




बीड ।प्रतिनिधी

पेठ बीड भागातील श्री क्षेत्र रामतीर्थ मठ या ठिकाणी परमपुज्य महायोगी दादा महाराज खडकीकर यांच्या आशिर्वादाने रामनवमी निमित्ताने गुढीपाडवा या दिवसापासून राम विजय ग्रंथाचे पारायण आयोजित केले आहे. त्यात सकाळी अभिषेक व आरती राम नाम जप सव्वा लक्ष ,संध्याकाळी हरिपाठ, भजन ,सुंदर कांड होणार असून नऊ दिवस रामविजय ग्रंथ वाचन शांतीब्रह्म श्री. विद्यागुरु महाराज खडकीकर हे करणार आहेत , रामनवमी उत्सव दि. सहा एप्रिल २०२५ रोजी दुपारी बारा वाजता राम जन्मोत्सव होणार आहे, राम जन्मोत्सवानिमित्ताने राममुर्तीस अभिषेक, आरती व भजन तर दि. सात रोजी सकाळी दहा ते एक यावेळी यजमान श्री अनिलसेठ, आनंद, अजय चरखा सहपरीवार यांच्या हस्ते श्रींच्या मूर्तीस अभिषेक व आरती, महापुजा होईल नंतर भोजन प्रसाद होईल तरी परिसरातील सर्व भाविकभक्तांनी राम जन्मोत्सवासह सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे यजमान तथा रामतीर्थ मठ संस्थानचे मठधीपती विद्यागुरु महाराज खडकीकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# उच्च शिक्षण संचालक डॉ. देवळाणकर यांचा सत्कार

लातूर ।प्रतिनिधी

पुणे येथील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा लातूरच्या राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे पुष्पगुच्छ व शाल देऊन संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी सत्कार केला.यावेळी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायभाये, संस्थेच्या सहसचिव तथा तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जी. आर. मुंडे उपस्थित होते.



**दारव्हा - दिग्रस-नेर-दारव्हा मतदारसंघातील पिंपळखुटा येथील सुपुत्र चि. शाहु राहुल जागताप यांची इंडियन नेव्हीमध्ये निवड झाल्याबद्दल आयोजित सत्कार सोहळ्यास मंत्री संजय राठोड उपस्थित राहून त्यांनी शाहू जगताप यांचे अभिनंदन केले व पुढील भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

# वात्सल्य व जिव्हाळ्याचे मुर्तीमंत व्यक्तीमत्व स्व. अंजनाबाई बोडखे - ह.भ.प.राऊतदादा महाराज



आष्टी (प्रतिनिधी)

आदर्शगाव आनंदवाडी येथील कै. अंजनाबाई कारभारी बोडखे यांनी मुले आणि नातेवाईकांवर चांगले संस्कार करीत चांगली संस्कारक्षम पिढी घडविण्याचे महत्वपूर्ण काम केले. वात्सल्य व जिव्हाळ्याचे मुर्तीमंत व्यक्तीमत्व स्व. अंजनाबाई बोडखे होत्या असे प्रतिपादन ह. भ. प. राऊतदादा महाराज यांनी केले.

आष्टी तालुक्यातील आनंदवाडी - सराटेवडगाव येथील शिक्षक व सांगवी पाटण येथील सुदर्शन माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांच्या मातोश्री अंजनाबाई कारभारी बोडखे (बाई) यांचे वृध्दापकाळाने बुधवार दि. १९ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या दशक्रियाविधी शुक्रवार दि. २८ मार्च रोजी आनंदवाडी येथे संपन्न झाला. यावेळी राऊतदादा महाराज बोलत होते.

दशक्रिया विधीच्या निमित्ताने ह. भ. प. राऊतदादा महाराज यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना ह. भ. प. राऊतदादा महाराज यांनी सांगितले की, कै. अंजनाबाई यांनी शुन्यातून विश्व निर्माण करीत कुटुंबाला पुढे नेले. आई हे नांव खुप मोठे आहे, त्या नांवाशी कोणीही तुलना करु शकत नाही. आईचे महत्त्व हे गेल्यानंतरच कळते. कै. अंजनाबाई या जुन्या पिढीतील सुसंस्कारित माळकरी, वारकरी महिला होत्या. लोकसंस्कृती जपणाऱ्या शांत, संयमी व अध्यात्म विचाराच्या होत्या. लोक साहित्याचा अनमोल ठेवा त्यांच्याकडे होता. जात्यावरचे गीते, नागपंचमीचे गीते, हळदी प्रसंगी म्हटली जाणारी गीते, लग्न विधी गीते अशा अनेक लोकगीतांचा खजिना अंजनाबाई यांच्या रूपाने काळाच्या पडद्याआड गेला. त्यांनी आपले कुटुंब एकसंघ ठेवले. त्यांनी नातेवाइक व आनंदवाडीतील कोणाचाही कधी तिरस्कार केला नाही. शेवटपर्यंत आनंदी आणि समाधानी जीवन जगल्या. त्यांचा कुटुंबातील सदस्यांना प्रेमाचा धाक होता. त्या गावातील सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर असत. कार्य सहभागी त्यांच्यापाठीमागे मुलगा व नातेवाईकांनी चांगली पिढी घडविण्याचे कार्य सुरुच ठेवले आहे. याप्रसंगी माजी आ. भीमराव धोंडे यांचे बंधू महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र धोंडे, ह. भ. प. निवृत्तीदादा बोडखे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, माजी पं. स. सदस्य प्रा. दादासाहेब झांजे, सरपंच सावता ससाणे, माजी सरपंच संजय नालकोल, धर्मनाथ शिंदे, पत्रकार उत्तम बोडखे, ह. भ. प. प्रविण महाराज तरटे, सरपंच भीमराव बोडखे आदिंनी श्रद्धाजली अर्पण केली. दशक्रिया विधी कार्यक्रमास सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह बोडखे कुटुंबियांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा वासंतिक वर्गाचा पालक मेळावा संपन्न

अंबाजोगाई- आगामी शैक्षणिक वर्षात २०२५-२६ इयत्ता दहावीत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा पालक मेळावा येथील श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात दि.२८/०३/२०२५ रोजी संपन्न झाला. या पालक मेळाव्याची सुरुवात माता सरस्वती,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाली.यावेळी वासंतिक वर्ग पालक मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल (दादा) देशपांडे तर व्यासपीठावर शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी सर,माता पालक संघाच्या उपाध्यक्षा सौ.शितल (ताई) कोदरकर, विद्यालयाचे पर्यवेक्षक सुर्यकांतउजगरे ,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,दहावी प्रमुख कल्पना जवळगांवकर,दहावी सहप्रमुख प्रमोद शिंदे यांची उपस्थिती होती. यावेळी पालकांनी आपल्या मनोगतातून विधायक सूचना केल्या तसेच शाळा गुणवत्ता वाढीसाठी घेत असलेल्या विविध उपक्रमांची प्रशंसा केली.या विद्यार्थ्यांसाठी जास्तीच्या सराव परीक्षा,बोर्ड पेपर लिखाण संदर्भात मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी आयोजित करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.यात जीवनराव बाजगीर,अबोली ढोले,ज्ञानेश मातेकर,नामदेव मुंडे, कुलकर्णी मॅडम,कराड या पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी सर म्हणाले की,पालकांचा आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी वारंवार शिक्षकांशी संपर्क व संवाद साधला पाहिजे.पालकांनी आपल्या पाल्यांच्या क्षमता ओळखून अपेक्षा ठेवल्या पाहिजेत.पालक व शिक्षकांनी एकत्रित प्रयत्न केल्यास विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढवता येईल यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील.त्याचबरोबर पालकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कष्टाशिवाय/अभ्यासाशिवाय पर्याय नाही याची वारंवार जाणीव विद्यार्थ्यांला करून द्यावी.तसेच संस्थेच्या व स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकारी शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षा,घटक चाचण्या,तज्ञ शिक्षकांचे विषयानुसार समुपदेशन,उन्हाळी वर्ग,रात्र अभ्यासिका उपक्रमांची माहिती दिली. या वासंतिक वर्गाच्या पालक मेळाव्याचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ.अतुल (दादा) देशपांडे यांनी म्हणाले की, विद्यार्थी शिक्षक व पालक हा त्रिकोण महत्त्वाचा आहे. जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास या बळावर उत्तुंग यश हमखास प्राप्त करता येते.दहावी हे शालेय जीवनातील महत्वाचे वर्ष आहेच.या वर्षात पाल्यांच्या आहार,

विहाराकडे काळजीपूर्वक लक्ष्य द्यावे.शाळा संस्था विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आणि दिशादर्शक उपक्रम करत असते.या आपला पाल्य सातत्याने सहभागी राहिलं यासाठी पालकांनी वेळोवेळी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती सपना डुकरे,प्रास्ताविक दहावी प्रमुख कल्पना जवळगांवकर,स्वागतपरीचय राजेंद्र शेप तर आभार प्रदर्शन दहावी सहप्रमुख प्रमोद शिंदे यांनी तर वैयक्तिक पद्य व कल्याण मंत्र मेधा जोशी यांनी सांगितला.यावेळी माता,पिता पालक व इयत्ता पाचवी ते दहावी चे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# माही पठाण हीचा पहिला रोजा पुर्ण

आष्टी (प्रतिनिधी)

मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. आष्टी येथील ऊबेद पठाण यांची मुलगी माही पठाण वय - ७ वर्ष ही पंडित नेहरू विद्यालय आष्टी या शिक्षण संस्थेमध्ये इयत्ता २ री मध्ये शिक्षण घेत असलेली माही या लहान मुलीने आयुष्यातील पहिला रोजा कडक उन्हाळा सुरू असतानाही शुक्रवार दिनांक २८ मार्च रोजी पुर्ण केला आहे. यावर्षीचा पवित्र रमजान महिना शनिवार दि. १ मार्च २०२५ रोजीच्या सायंकाळ पासून आरंभ झाला. माही पठाण हिने दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोर पाळत आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वी पुर्ण केल्याबद्दल नातेवाईक व इतरांनी तिचे कौतुक व अभिनंदन केले.





# कालिका देविच्या नैवेद्यासाठी कोरडा सीदा !

## गव्हाचे पिठ ,तांदूळ ,दाळ गुळासह तेल तुप देखील !

शिरूर कासार : येथील जाज्वल्य देवस्थान तथा सर्वाचे श्रध्दास्थान असलेल्या कालिका देवीचा अमावशा हा मोठा उत्सव असतो ,शनिवारी हा उत्सव साजरा करण्यात आला,यावेळी ज्या घरी नैवेद्य करणे शक्य होत नाही किंवा अन्य अडचणी असणा-या कुटूंबाकडून देवीच्या नैवेद्यासाठी कोरडा सीदा देण्याची प्रथा असुन यात नव्या गव्हाचे पिठ ,तांदूळ ,गुळासह तेल तुप देखील आणून देण्यात आला .

कालिका देविचा नव्याची अमावशा हा मोठा सण प्रतिवर्षी साजरा होत असतो आणि देवीला नव्या गव्हाचा पुरणपोळीचा नैवेद्य दाखवल्यानंतरच गहू खाण्यास सुरूवात होते मात्र आपल्या घरून नैवेद्यासाठी काही अडचन असेल तर त्या घरून कोरडा सीदा पोहच करून नैवेद्य पोहचला असा भाव व्यक्त केला जातो ,सीदा देण्यात शिरूरसह कान्होबाची वाडी ,कोळवाडी ,झापेवाडी ,दहिवंडी सह अन्य देवीभक्त सहभाग घेतात ,गव्हाचे पिठ ,तांदूळ ,गुळ ,तूर दाळ ,हरभरा दाळ ,तिखट मिठाबरोबर तेल तुप देखील दिले जाते .पुजा-यामार्फत हा सामुहीक नैवेद्य समर्पित केला जातो .

# पांच दिवस उपवासाचा समारोप !

## कालिकादेवीचा कुलाचार ,दिप अमावशा ,पालखी सोहळा ! देविची मुख्य मुर्ती दिवट्या छत्री आणि झांज घंटेच्या गजरात सिंदफना डोहावर ! नव्या गव्हाचा पुरण पोळीचा नैवेद्य दाखवून गव्हाचा घरगुती वापर सुरू !

शिरूर कासार : कासार समाजाचे कुलदैवत आणि हजारो भाविकांचे श्रध्दास्थान म्हणून ग्रामदैवत असलेल्या कालिका देवीची शनिवारी दिप अमावशा (नव्याची अमावशा ) निमित्ताने देविची मुख्य मुर्ती सजवलेल्या पालखीत सिंदफना नदीडोहावर दिवटी ,छत्री ,झांज आणि घंटाच्या गजरात जाऊन तिथे कावडीचे जलाभिषेक ,महापुजा ,महावस्त्र आणि महाआरती झालेनंतर पुनरागमन मंदिरात होते ,पुन्हा आरती नंतर नव्या गव्हाच्या पुरण पोळीचा नैवेद्य समर्पित करून पांच दिवस उपवासाचा समारोप करून नवे गहू घरगुती वापरात येतात ही जुनी परंपरा आजही भक्तिभावाने जोपासली जाते ,उपवास दरम्यान अनवानी पायाने तर अमावशेच्या दिवशी सर्वच देवीभक्त उपवास करून पायात पादत्राणे घालत नाही ही प्रथा देखील जोपासली जाते .

शिरूर शहरात सिध्देश्वर संस्थानवर महाशिवरात्र तर कालिका देवी मंदिरात नवरात्र ही महापर्वणी साजरी होत असते ,तर देवीच्या दोन अमावशा महत्वपूर्ण मानल्या जातात त्यात एका अमावेशाल जुन्याची तर एका अमावशेला नव्याची अमावशा म्हटले जाते .

तोपर्यंत शिरूरकर खात नाही नवे गहू !

शेतात पिकलेले नवे गहू घरी आले तरी जोपर्यंत देवीला अमावशेच्या दिवशी नव्या गव्हाची पुरणपोळी नैवेद्य दाखवत नाही तोपर्यंत गहू खात नाही एव्हडेच नव्हे तर नवे गहू पिठाच्या गिरणीत दळले जात नाही .

शिरूरसह परिसरातील गावांत देखील प्रभाव !

कासार समाजासह शहरात जसा हा कुलाचार भक्तिभावाने साजरा होत असतो तसाच परिसरातील कांही संबधीत वाड्या वस्त्या वरील देवीभक्तांवर हा प्रभाव असल्याने ते देखील उपवास करून नैवेद्यासाठी सीदा देऊन आपला भाव समर्पित करतांना उपवास देखील करतात .

तीन वेळा मुख्य मुर्ती जाते मंदिराबाहेर !

वर्षातून दोन वेळा देवीची मुख्य मुर्ति सिंदफना नदीकाठी व दस-याच्या दिवशी सिध्देश्वर मंदिरात सिमोलंघनाला जात असते याला शिवशक्तिची भेट देखील मानली जाते .

विश्वस्थांची जबाबदारी !



कालिका देवीचा सर्व कुलाचार साग्रसंगित पार पाडण्याची जबाबदारी हे विश्वस्थ मंडळ तंतोतंत पाळत असते त्यात अध्यक्ष असलेले रोहिदास पाटलासह उपाध्यक्ष गोविंद पाटील ,सचिव बापुराव गाडेकर यांचेसह सर्व विश्वस्थ परिश्रम घेत असतात .श्रमदान तर अंगवळणी पडलेले !

मंदिरात कोणतजही नवे जुने काम करायचे का सेल मग ते कितीही श्रमाचे असले तरी त्यात पैसा खर्च होऊ नये यासाठी अध्यक्ष रोहिदास पाटील आवाहन करतात आणि श्रमदानासाठी तरूणाईसह समाज रात्री श्रमदानात सहभागी होतात ,श्रमदान हे जणू अंगवळणीच पडलेले सतत दिसून येते .वर्षाकाठी किमान आठ दहा लाखाची श्रमदानातून बचत होत असल्याची माहिती विश्वस्थ सांगतात .

# प्रिन्सिपल राकेश पवार यांचा पत्रकारांच्या वतीने सत्कार

शिरूर (प्रतिनिधी)

शहरातील आयडियल इंग्लिश स्कूलचे प्रिन्सिपल राकेश पवार यांना बेस्ट प्रिन्सीपल पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल शिरूर पत्रकारांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.मुंबई येथे पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या कार्यक्रमात राकेश पवार यांचा पहिल्या महिला सनदी अधिकारी किरण बेदी आणि राष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू पद्मविभूषण सायना नेहवाल यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला होता.त्यांच्या या सन्मानामुळे शिरूर तालुक्याची शैक्षणिक क्षेत्रात उंची वाढल्यामुळे पत्रकार बांधवांच्या वतीने शाल,श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.या वेळी पत्रकार ,भारतकुमार पानसंबळ, गोकुळ पवार प्रमोद निकम आणि सर्पमित्र महेश औसरमल यांची उपस्थिती होती.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).


# मोत्यांच्या अक्षरांचे केंद्र ठरतेय भवरवाडीची

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील जि. प. प्रा. शाळा भवरवाडी (किन्ही) या शाळेत पहिली ते चौथी या चार वर्गात ३० विद्यार्थी आहेत. येथे मुख्याध्यापक सुनिल काकडे तर सहशिक्षक म्हणून अनिल बेद्रे आहेत. अनिल बेद्रे हे शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबर सर्व विद्यार्थ्यांचे सुंदर हस्ताक्षर होण्यासाठी विशेष परिश्रम घेतात. शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता चांगली आहे. या शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांचे सुंदर हस्ताक्षर आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांचे पाठांतर, पाढे पाठांतर, इंग्रजी वाचन चांगले आहे. प्राथमिक शिक्षण दर्जेदार मिळत आहे. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी कलेग्राफी साठी ३०० रु. किंमतीचे पेन सरपंच भरत भवर यांनी दिले आहेत. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण भवर, संतोष भवर यांचेही शाळेसाठी योगदान असते. येथे ५५ ते ६० वर्षापूर्वीची जुनाट अशी दोन खोल्यांची शाळेची इमारत आहे. ही इमारत विद्यार्थ्यांना बसण्यायोग्य नाही. येथे इमारत होणे गरजेचे आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचा दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला जातो. १०० ते १२५ घरे असलेली ही वाडी आहे, मात्र जागरुक पालकांमुळे प्राथमिक शाळेत दर्जेदार ज्ञानदानाचे कार्य शिक्षक करत आहेत. ग्रामस्थांचा लोक सहभाग व शाळेला मदत करण्याची भुमीका असल्याने विविध शैक्षणिक उपक्रम, कार्यक्रम राबविले जातात. पालक, ग्रामस्थांच्या सहभागातून शाळेत नुकतीच शिवजयंती साजरी झाली. यानिमित्ताने तीन तासांचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला. यावेळी पालक व ग्रामस्थांनी सढळ हाताने विद्यार्थ्यांना बक्षीसे दिली. ४० हजार रु. जमले आहेत. सरपंच ज्या शाळा खोलीत शिकले ती इमारत आता नादुरुस्त झाल्याने येथे सुमारे १५ ते २० लाख रु. खर्चुन दोन खोल्या स्लबच्या (आरसीसीच्या) बांधण्याचा सरपंच भरत भवर, उपसरपंच, ग्रा. पं. सदस्य व ग्रामस्थांचा प्रयत्न सुरु आहे.मुख्याध्यापक सुनिल काकडे हे ९ वर्षापासून या शाळेत आहेत तर अनिल बेद्रे सर हे दोन वर्षापासुन येथे कार्यरत आहेत. भवरवाडीची प्राथमिक शाळा ही मोत्यांच्या अक्षरांची शाळा असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.



सुंदर हस्ताक्षरासाठी विशेष परिश्रम

मुख्याध्यापक सुनिल काकडे सरांच्या मार्गदर्शनाखाली अनिल बेंद्रे सरांनी विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. अधिकचा एक तास दिल्याने सर्वच विद्यार्थ्यांचे जवळपास हस्ताक्षर सुंदर झाले.सांस्कृतिक कार्यक्रमात अव्वल

भवरवाडी येथील जिल्हा परिषदेची शाळा ही तशी छोटी आहे. इमारत मध्यमच असल्याने परंतु विद्यार्थी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास करतात. गुणवत्ते बरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ही उत्स्फूर्त भाग घेतात. याचाच परिपाक म्हणून दरवर्षी होणारे स्नेहसंमेलन हे त्यांच्या कलागुणांची सादरीकरणातील उत्कृष्ट कलाकृती होत असून सांस्कृतिक कार्यक्रमांचा एक वेगळा ठसा या परिसरात या शाळेने उमटविलेला आहे.

# पाटोदा येथे आ. सुरेश धस यांच्या वतीने रोजा इफ्तार पार्टी

पाटोदा । आजीज शेख

मुस्लिम धर्मियांच्या पवित्र रमजान निमित्ताने पाटोदा येथे आ. सुरेश धस यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. अनेक् वर्षांपासून धस यांच्याकडून पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टी देण्यात येत आहे. पाटोदा येथे माजी जि.प. अध्यक्ष तथा नगरसेवक सय्यद अब्दुल्ला यांच्या घरासमोर गुरुवारी रोजा इफ्तारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तात्यासाहेब हुले. जिया बेग. किरण शिंदे नगराध्यक्षपती राजु जाधव. उपनगराध्यक्ष रोहिदास गिते तहसीलदार दत्तात्रय निलाबाड. अभय जोशी. नायबतहसिलदार. शरद बामदळे सय्यद आदमशेठ. सय्यद शहानवाज. सय्यद शहाबाज. पि.ऐ.सोमीनाथ कोल्हे,केशव रसाळ, सुनील वाघमारे. पदमाकर घुमरे. उमर चाऊस. आड. जब्बार पठाण. नय्युम पठाण, सय्यद शहाबाज.पत्रकार आजीज शेख



विश्वनाथ हुले. भागवत येवले. महादेव जाधव. कल्याण भोसले. असिफ सौदागर बालाजी जाधव गणेश बामदळे. बाळासाहेब घरत. सुमित हुले. संदिप जावळे जाधव.एल.आर.. पंपु गोरे. सय्यद शफुशेठ. पोपट कोल्हे. राजु भोंडवे. बाळासाहेब जावळे. संदिप जाधव. हनुमत काळे. शेख आसिफशेठ. विकास सानप. जितेंद्र भोसले.. किशोर अडागळे. विशाल आरसुळ, टाळके साहेब. पिंटु रुपनर, भैय्या घुमरे. बाबा तिपटे. महेश भाकरे. भैय्या राऊत. साजेद भाई. दता साठे. डॉ. संजय कवठेकर. प्रकाश जावळे. जितु सांगळे. अंगद सांगळे. आदींसह हिंदू मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत सय्यद मुक्तारभाई. सय्यद शहानवाज. सय्यद शहाबाज. सय्यद आदमशेठ. यांनी केले.

# जिजाऊ रथयात्रा मराठा जोडो अभियान यात्रेचे केज शहरासह ग्रामीण भागात जोरदार स्वागत

केज/प्रतिनिधी

जिजाऊ रथयात्रा मराठा जोडो अभियानाचे कळंब शहरातून गुरूवारी दि.२७ मार्च गुरुवारी सकाळी केज तालुक्यात आगमन झाले.जिजाऊ रथयात्रा मांजरानदी ओलांडून केज तालुक्यात दाखल होताच ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळयेथील शहाजीराजेभोसले यांच्या गढीपासून निघालेल्या जिजाऊ रथयात्रा मराठा जोडो अभियान संपूर्ण राज्यात भ्रमण करून पुणे शहरातील लाल महालात समारोप होणार आहे.कळंब येथून गुरूवारी सकाळी केज तालुक्यातील खोंदला, भोपला,बोरगाव,हनुमंत पिंपरी,काळेगाव घाट, आरणगाव,मस्साजोग येथून केज शहरातदाखल झाली.केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जिजाऊ च्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण रमेशराव आडसकर, सौरभ सोनवणे,शिवाजी ठोंबरे,नगराध्यक्षा सिता बनसोड,गटनेते हारूण इनामदार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.या रथयात्रेचे केज




शहरासह ग्रामीण भागात जोरदार स्वागत करण्यात आले.दुपारचे भोजन केज येथे करून रथयात्रा ढाकेफळ,कुंबेफळ,चंदन सावरगाव व होळ मार्गे अंबाजोगाई शहराकडे रवाना झाली.मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरूषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या रथयात्रेत सौरभ खेडेकर,प्रा.जेष्ठ मार्गदर्शक अर्जुन तनपुरे, प्रदेश कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे,प्रदेश उपाध्यक्ष संदीपान जाधव,संभाजी ब्रिगेड कार्याध्यक्ष डॉ. गजानन पारधी,जिजाऊ ब्रिगेडच्या श्रीमती बोराडे, मराठा सेवा संघाचे बीड जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव,छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी ठोंबरे,भाई मोहन गुंड, पशूपतीनाथ दांगट, दिलीप गुळभिले,योगेश आंबाड,तालुकाध्यक्ष जयदीप देशमुख,पंजाब देशमुख शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर भालेराव,मराठा सेवा संघाचे जिल्हाउपाध्यक्ष युवराज हिरवे,हनुमंत घाडगे,राहुल खोडसे, अरविंद थोरात,धनराज इंगोले,अश्विन टोम्पे यांच्यासह मराठा समाज बांधव सहभागी झाले होते.

# केज शहरातील साई सुर्या डायग्नास्टीक सेंटरला शार्टसर्किटने लागली आग

## डॉ.सचिन राऊत यांच्या घरातील व क्लिनिक मधील सामान जळुन खाक,जीवीत हानी टळली



केज/प्रतिनिधी

केज शहरातील कानडी रोड येथील डॉ.सचिन राऊत यांच्या साईसुर्या डायग्नास्टीक सेंटर व घरातील किचन रुमला भीषण आग लागल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. घरातील फ्रिज भिंतीला खेटून ठेवल्यामुळे फ्रिज मधील गॅस गरम होऊन त्याचा शॉर्टसर्किट झाला. उष्णतेमुळे मोठी आग तयार झाली.याउष्णतेच्या ए.सी.कूलर संपर्कात आल्यामुळे त्यालाही भीषण आग लागली.

किचन मधील सर्व वस्तू जळाल्या आहेत.सदरील ठिकाणी वस्तूंचे फक्त अवशेष पाहायला मिळाले.किचनच्या बाजू लाच असलेल्या डायग्रोस्टिक सेंटरच्या रूमलाही भीषण आग लागून सोनोग्राफीची मशीन व इतर सामग्री यामध्ये जळून खाक झाली.नगर पंचायत केज अग्निशामक दलाच्या सहकार्याने आग आटोक्यात आली.या आगीमुळे डॉ.सचिन राऊत यांचे अतोनात नुकसान झाले असले तरी यामध्ये कुठलीही जीवित हानी झालेली नाही. दरम्यान विजेचा लपंडाव होत असल्यामुळे विजेचा दाबही कमी जास्त होत आहे.महावितरण कंपनीने याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे नागरिकांतुन बोलले जात आहे.

# ‘युध्द पेटले आहे’ : संवेदनशील मनाची उत्कट अभिव्यक्ती- प्रा.ललिता गादगे

पाटोदा (प्रतिनिधी)

’साहित्य म्हणजे केवळ शब्दांची मांडणी नव्हे, ती असते समाजाच्या मनातील आंदोलनाची अभिव्यक्ती. मनाच्या उत्स्फूर्त हूंकाराला शब्दरूप देत, अन्यायाविरुद्धची धगधगती लढाई कवितेतून मांडणाऱ्या कवी बाळासाहेब नागरगोजे यांच्या ’युद्ध पेटले आहे’ या महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, महाराष्ट्र शासनाचे अनुदान प्राप्त काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा प्रगतिशील लेखक संघ व एकता फांऊडेशनच्या संयुक्त विद्यमाने नुकताच डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे संपन्न झाला.

हा सोहळा केवळ साहित्यिक कार्यक्रम नव्हता, तर तो होता परिवर्तनाच्या निर्धाराचा महोत्सव. शाहीर समाधान इंगळे, शाहीर अमरजीत बाहेती आणि नभा यांच्या क्रांतिकारी गीतांनी सभागृह भारावून गेले. शहीद दिनाचे औचित्य साधत भगतसिंह, राजगुरू, सुखदेव तसेच अवतारसिंह ’पाश’ आणि साळूबाई डोरले यांच्या प्रतिमांचे पूजन आणि अभिवादन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली.

ज्येष्ठ कवयित्री व लेखिका प्रा. ललिता गादगे यांच्या शुभहस्ते कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले.प्रा.गादगे यांनी ’या कविता म्हणजे काळीज वेदनांचे आणि तरल भावनांचे शब्दशिल्प आहेत’, असे मत व्यक्त केले.’युध्द पेटले आहे ’ हा काव्यसंग्रह संवेदनशील मनाची उत्कट अभिव्यक्ती आहे, असे त्यांनी नमूद केले.




या काव्यसंग्रहावर भाष्य करताना साहित्य अकादमी युवा पुरस्कार विजेते कवी डॉ. वीरा राठोड म्हणाले की, ’नागरगोजे यांच्या कवितांमध्ये समाजभान व संघर्षाची गर्जना आहे. ही कविता केवळ शोषितांच्या वेदनांची तडफड नाही, तर ती त्यांच्या हक्कासाठी उभे राहण्याची हाक देते. सामाजिक न्यायासाठी एल्गार पुकारणारी ही कविता आहे’. अभ्यासपूर्ण व ओघवत्या शैलीत त्यांनी या काव्यसंग्रहाचे अनेक पैलू उलगडून दाखवले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रगतिशील लेखक संघाचे जिल्हाध्यक्ष राजकुमार कदम यांनी केले. कवी बाळासाहेब नागरगोजे यांनी आपला जीवनप्रवास आणि काव्यप्रेरणेचे संदर्भ उलगडताना भावनाप्रधान शब्दांत मनोगत व्यक्त केले.’ही कविता केवळ माझी नाही, ती माझ्या मातीची आहे. माझ्या कष्टकरी आई- बापाच्या अश्रूंची आहे. भगतसिंहांचे जाज्वल्य विचार ही माझी प्रमुख काव्य प्रेरणा राहिली आहे’, असे ते म्हणाले.मराठवाडा साहित्य परिषदेचे संचालक तसेच एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अनंत कराड, जागतिक साहित्याचे अभ्यासक जयपालसिंह शिंदे यांनी कविता संग्रहावर भाष्य केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुधाकर शेंडगे यांनी ’ही कविता म्हणजे एका नव्या सामाजिक जाणिवेचा प्रपंच आहे. ती केवळ वेदना सांगत नाही, तर क्रांतीची दिशा दाखवते. समाज शिक्षकाची भूमिका कवी घेताना दिसतो’ असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाला विशेष उपस्थिती डॉ. रामदास नागरगोजे, माजी कॅप्टन प्रल्हाद बांगर, कॉ. नामदेव चव्हाण, राजकुमार कदम,गोकुळ पवार, ड. करूणा टाकसाळ, राजेंद्र गोरे, नवनाथ मिसाळ, द. ल. वारे, संजय सावंत, रमेश बडे, परशुराम सोंडगे, अजित तांदळे, प्रमोद सानप, ड.महेश भोसले, ड. भीमराव चव्हाण, ड. अंबादास आगे, कवी पंजाब येडे, प्रकाश घाडगे,प्रमोद सानप, वर्षा केंडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला-पुरुष श्रोते उपस्थित होते. सभागृहात बसायला जागा मिळाली नसल्याने अनेक श्रोत्यांनी जागा मिळेल तेथे उभे राहून लाभ घेतला. वाचकांनी कवी बाळासाहेब नागरगोजे यांच्याशी संवाद साधत कवितांवरील आपली मते मांडली. सूत्रसंचालन डॉ. समाधान इंगळे यांनी केले, तर येडेश्वर नागरगोजे यांनी आभार व्यक्त केले.

# शाहीर तुकाराम सुवर्णकार यांना युवा समाजभूषण राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील बनसारोळा येथील भूमिपुत्र शाहीर तुकाराम सूर्यकांत सुवर्णकार यांना अखिल भारतीय सोनार समाज प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांच्याकडून दिला जाणारा मानाचा पुरस्कार २०२५ चा युवा समाजभूषण राज्यस्तरीय पुरस्कार देऊन पंढरपूर येथे मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

तुकाराम सुवर्णकार महाराज हे परिसरात अनेक वर्षापासून शाहीर म्हणून परिचित आहेत गायन ,जनजागृती,कला क्षेत्रात त्यांचानावलौकिक आहे त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना युवा समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजेश भाऊ पंडित,निवड समितीचे राजेंद्र पारखे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# आज गुढीपाडवा जाणून घ्या शुभ मुहूर्त,पूजा विधी आणि सणाचे महत्त्व

संकलन
चंद्रकांत पाटील

आज गुढीपाडवा आहे गुढीपाडवा सण म्हणजे मराठी नववर्षाचा शुभारंभ.चैत्र शुद्ध प्रतिपदेस गुढीपाडवा हा सण साजरा केला जातो. या दिवशी घर स्वच्छ करुन दारासमोर सुंदर रांगोळी काढली जाते. लहान-थोर सर्व मंडळी पारंपरिक कपडे परिधान करुन गुढी उभारुन तिची पूजा करतात.घराघरांत पारंपरिक स्वयंपाकही तयार केला जातो.गुढी उभारणे हे आनंद आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते.यंदा गुढीपाडवा सण कसा आहे,शुभ मुहूर्त,पूजा विधी आणि सणाचे महत्त्व जाणून घेऊया.हिंदू पंचांगानुसार चैत्र



महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीचा शुभारंभ दि.२९ मार्च रोजी संध्याकाळी ४-२७ वाजता होणार असून दि.३० मार्च दुपारी १२-४९ वाजता तिथी समाप्त होणार आहे.हिंदू धर्मामध्ये आजच्या तिथीचे विशेष महत्त्व आहे,त्यामुळे गुढीपाडवा सण दि.३० मार्च रोजी साजरा केला जाईल.

गुढीपाडव्याची पूजा कशी करावी ?

पहाटे उठून अभ्यंगस्नान करावे आणि पारंपरिक कपडे परिधान करावे. सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण करावे.घरासमोर रांगोळी काढून दिवा लावा.घरा समोर गुढी उभारा आणि तिची पूजा करावी.गुढीला नैवेद्य अर्पण करावा. पारंपरिक भोजनासह श्रीखंड,पुरणपोळी असे गोड पदार्थही तयार करावे.गरजूंनाही दान करावे.सुखाची गुढी, आनंदाचा कळस म्हणत प्रियजनांना पाठवा गुढीपाडवा सणाच्या खास शुभेच्छा,गुढी उभारण्याची शुभ दिशा

गुढी पूर्व दिशेला उभारणे शुभ मानले जाते.कारण या दिशेला सूर्योदय होतो. म्हणूनच पूर्वे दिशेला शुभ, उर्जा आणि नव्यागोष्टींच्या शुभारंभाचे प्रतीक मानले जाते.याव्यतिरिक्त तुम्ही उत्तर-पूर्व दिशेमध्येही गुढी उभारू शकता, ज्यामुळे घरामध्ये सकारात्मक ऊर्जा आणि समृद्धी नांदेल.

गुढीपाडव्याचे महत्त्व

पौराणिक कथांनुसार गुढीपाडव्याच्या दिवशी ब्रह्मदेवाने सृष्टीची रचना केली होती.तसेच या दिवशी वसंत ऋतूचाही शुभारंभ होतो.हा सण नवा उत्साह आणि नवीन जीवनाच्या सुरुवातीचेही प्रतीक मानले जाते.हा उत्सव हिंदू धर्माची परंपरा,संस्कृती आणि शेतीचेही महत्त्व सांगतो. आजच्या दिवशी शेती कामाचा शुभारंभ चालु केला जातो.

# प्रत्यक्ष गावात जाऊन आढावा





विश्वनायक न्यूज

बीड तहसीलचे तहसीलदार चंद्रकांत शेळके हे नेहमीच थेट ग्राम स्तरावर जाऊन काम करताना दिसतात. लोकांच्या आणि अडचणी समजून घेऊन त्या जागेवरच सोडविण्यावर त्यांचा भर असतो. बीड तालुक्यातील ढेकनमोहा, घाटसावळी येथे ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत उर्वरित शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावेत यासाठी भेट देत संवाद साधला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांसह इतर योजनेच्या लाभार्थ्यांना केवायसी करण्याबाबत आवाहन केले. बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची काम करण्याची शैली ही सगळ्यांपेक्षा वेगळी असून, यामुळे त्यांचा थेट संबंध हा ग्रामीण जनतेशी येत आहे. लोकांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यावर उपाय सांगणे शिवाय शासकीय कामे कोणत्याही ठिकाणी अडविले जाऊ नये त्यासाठी स्वतः प्रयत्न करणे याकडे चंद्रकांत शेळके यांचा नेहमी कल असतो. लोकांना शासकीय कार्यालयात येण्यापेक्षा त्यांचे आहे त्याच ठिकाणी काम करून देण्याकडे ते लक्ष देतात. शासन शेतकऱ्यांसह इतर समाजासाठी वेगवेगळ्या योजना राबवत आहे, यासाठी तहसीलच्या विविध विभागातून या योजनांची अंमलबजावणी केली जाते. ती अंमलबजावणी कोणती आणि लाभार्थ्यांना योग्य पद्धतीने आणि वेळेवर लाभ मेळावा याकडे तहसीलदार चंद्रकांत शेळके विशेष लक्ष देतात. बीड तालुक्यातील घाटसावळी आणि ढेकनमोहा येथे ग्रीस्टॅक प्रकल्प अंतर्गत शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावे यासाठी त्यांनी आवाहन केले. संजय गांधी योजना, डीबीटी प्रक्रिया तहसील कार्यालयात येऊन पूर्ण करावी याचे आवाहन केले. स्वस्त धान्य लाभार्थी यांनी ई केवायसी करावी. शेतकरी अनुदान पात्र लाभार्थ्यांनी सुद्धा ई केवायसी करावी असे आवाहन केले. यावेळी चंद्रकांत शेळके यांनी प्रलंबित फेरफार बाबत सुद्धा आढावा घेतला. एकूणच ग्रामीण पातळीवर जाऊन चंद्रकांत शेळके हे नेहमीच काम करताना दिसतात. लोकांच्या अडचणी तात्काळ सोडविणे आणि ज्यांना योजना बाबत माहिती नाही त्यांना माहिती देऊन लाभ मिळवून देणे अत्यंत महत्त्वाचे काम चंद्रकांत शेळके हे स्वतःहून करीत असल्याचे अनेक वेळा दिसले आहे. त्यांच्या याच कामाच्या पद्धतीने ते अनेकांचे प्रश्न सोडवित असून जनतेमधूनही समाधान व्यक्त केले जात आहे.

# बीडमध्ये भाषण सुरु असतानाच अचानक मनोज जरांगेंची प्रकृती खालावली

## तातडीने रुग्णालयात दाखल, नेमकं काय घडलं?

बीड /प्रतिनिधी

शहरातील एका मंगल कार्यालयात मराठा समाजातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या मेळाव्याचे आयोजन शुक्रवारी सायंकाळी करण्यात आले होते. या मेळाव्याला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी देखील हजेरी लावली. मात्र, भाषण करत असतानाच अचानक मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली. यानंतर त्यांना उपचारासाठी तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील २४ तासांसाठी डॉक्टरांच्या निगराणीखाली असणार आहेत.

बीडमधील मेळाव्याला मनोज जरांगे पाटील यांनी आवर्जून हजेरी लावली. या मेळाव्यात भाषण करत असताना मनोज जरांगे पाटील यांना अचानक चक्कर येऊ लागली. पण मनोज जरांगे यांनी सुरुवातीला त्याकडे दुर्लक्ष केले. यानंतर जास्त चक्कर येत असल्याने त्यांनी मंचावर खाली बसून भाषण केले. हा मेळावा उरकून आयोजकांनी मनोज जरांगे यांना तातडीने बीडमधील रुग्णालयात दाखल केले आहे.

मनोज जरांगे पाटील २४ तासांसाठी डॉक्टरांच्या निगराणीखाली

आता मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील २४ तासांसाठी डॉक्टरांच्या निगराणीखाली असणार आहेत. डॉक्टरांनी मनोज जरांगे पाटील यांच्या तपासण्या केल्या आहेत. रक्ताचे नमुने देखील घेण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असली तरी २४ तासांसाठी त्यांना बीडच्या रुग्णालयात डॉक्टरांच्या निगराणीखाली ठेवले जाणार असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. प्रकृती साथ देत नसल्याचे जरांगे पाटील यांनी भाषणात सांगितले होते.

शहरातील एका मंगल कार्यालयात मराठा समाजातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या मेळाव्याचे आयोजन शुक्रवारी सायंकाळी करण्यात आले होते. या मेळाव्याला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी देखील हजेरी लावली. मात्र, भाषण करत असतानाच अचानक मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली. यानंतर त्यांना उपचारासाठी तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील २४ तासांसाठी डॉक्टरांच्या निगराणीखाली असणार आहेत.



### मेळाव्याला धनंजय देशमुखांचीही उपस्थिती

दरम्यान, बीडमध्ये मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख देखील या कार्यक्रमात हजर होते. यावेळी व्यासपीठावर मनोज जरांगे पाटील आणि धनंजय देशमुख भावूक झाले. संतोष देशमुख यांच्या हत्येचा घटनाक्रम सांगताना मनोज जरांगे पाटील, धनंजय देशमुख आणि उपस्थित महिला गहिवरल्याचे पाहायला मिळाले. मराठा समाजाने एकजूट कायम ठेवण्याचे आवाहन देखील मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी केले. तर संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना जोपर्यंत फाशी मिळत नाही, तोपर्यंत शांत बसणार नाही, असा एल्गार देखील मनोज जरांगे यांनी केला.


# पाटोदा, शिरूरमध्ये कावळ्यांचा मृत्यू

## २ दिवसांत भोपाळहून येणार अहवाल:बर्ड फ्लूसह उष्णतेचे असू शकते कारण, पशुसंवर्धन विभागाचा प्राथमिक अंदाज

बीड /प्रतिनिधी

पाटोदा शहरात मागील पाच दिवसांत २९ कावळ्यांचा अचानक मृत्यू झाल्याची घटना समोर आली. पाटोदा येथील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी कावळ्यांची पाहणी करून नमुने भोपाळ येथील राष्ट्रीय उच्च सुरक्षा प्राणी रोग संस्थेला तपासणीसाठी पाठवले आहेत. दुसरीकडे शिरूर येथील सिध्देश्वर मंदिराच्या परिसरात दोन कावळ्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. बर्ड फ्लू आणि वाढती उष्णता या दोन कारणांमुळेच कावळ्याचा मृत्यू होत असल्याचा प्राथमिक अंदाज पशुसंवर्धन विभागाने व्यक्त केला असून भोपाळच्या प्रयोग शाळेतून दोन दिवसांत अहवाल येणार आहे.

केज तालुक्यातील देवदहीफळ येथे काही कावळ्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता पाटोदा शहरातील न्यायालय परिसर व बसस्थानक परिसरात २४ मार्च ते २६ मार्च अशा चार दिवसांत तब्बल २९ कावळ्यांचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शहरातील न्यायालय परिसरात आणि बसस्थानक परिसरात तब्बल २९ कावळे मृत आढळून आले आहेत. पशुधन विकास अधिकारी डॉ. अमोल मोहोळकर यांच्यासह त्यांच्या पथकाने याची पाहणी करून कावळ्याचे नमुने भोपाळ येथील प्रयोगशाळेत तपासण ीसाठी पाठवले. पाटोदा बसस्थानक परिसरात कावळ्यांचा अधिवास असून या ठिकाणी साचलेले घाण पाणी कावळे पित होते. या दूषित पाण्यातून कावळ्याला संसर्ग झाला असून संसर्ग हेच कावळ्याच्या मृत्यूचे कारण असावे. कुठेही कावळ्याचा अनैसर्गिक मृत्यू झाल्यास संपर्क करावा, अशा कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. –डॉ.



दत्तात्रय इंगोले, सहायक आयुक्त, पशुसंवर्धन पाटोदा व शिरूर येथे बर्ड फ्लू व उष्णतेमुळे कावळ्यांचा मृत्यू होत असल्याचा प्राथमिक अंदाज पशु संवर्धन विभागाने व्यक्त केलेला असून भोपाळ येथील राष्ट्रीय उच्च सुरक्षा प्राणी रोग संस्थेकडून नमुने तपासणीचा अहवाल आल्यानंतर नेमके कारण स्पष्ट होणार आहे. उष्णतेमुळे पाटोदा व शिरूर तालुक्यात कावळ्यांच्या मृत्यूच्या घटना समोर येत आहेत. बदलणाऱ्या वातावरणामुळे बर्ड फ्लूचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढत असतो. शिरूर शहरात मृत झालेल्या कावळ्यांचा मृत्यू बर्ड फ्लूमुळेच असल्याचा आम्हाला संशय आहे. – सिद्धार्थ सोनवणे, प्राणिमित्र, शिरूर

अहवाल प्राप्त झाल्यानंतर कावळ्यांच्या मृत्यूचे कारण समोर येणार आहे, तर दुसरीकडे शिरूर येथील सिध्देश्वर मंदिर परिसरातही कावळ्यांचा मृत्यू झालेला असून या ठिकाणी २०० कावळ्यांचा मृत्यू झाल्याचा अंदाज प्राणिमित्रांनी व्यक्त केला असला तरी पशू विभागास दोन कावळे मृत अवस्थेत आढळून आले.

# स्पर्धा परीक्षेत उतरत असताना परीश्रम पुर्वक उतरा- डॉ. पी.व्ही.अनभुले

## बलभीम महाविद्यालयात रसायनशास्त्र व आयक्युएसी यांच्या वतीने आयोजित नेट, सेट कार्यशाळेत प्रतिपादन

बीड (प्रतिनिधी)

नेट, सेट परीक्षेचा अभ्यास करतांना सातत्य आवश्यक असते. तसेच परिस्थिती माणसाला खंबीर बनवते . आपल्या करिअरला उंचावर नेण्याचे काम नेट व सेट या परीक्षा करतात. संशोधन करण्यासाठीही नेट जेआरएफ पर्याय आहे.दररोजचे वर्तमानपत्र वाचन आवश्यक असते असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील सेट समन्वयक डॉ. पी.व्ही. अनभुले यांनी केले.

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने एक दिवसीय नेटसेट कार्यशाळा-२०२५ आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी प्रमुख साधन व्यक्ती म्हणून रसायनशास्त्र विभाग आणि सेट समन्वयक, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील प्रो. डॉ. प्रशांत अनभुले प्रमुख मार्गदर्शक करतांना बोलत होते. मंचावर प्रो. डॉ.नानासाहेब शितोळे रसायनशास्त्र विभाग श्री. शिवाजी कॉलेज, परभणी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. संतोष उंदरे हे होते तर उपप्राचार्य प्रो. डॉ. बाबासाहेब कोकाटे, खट-उ समन्वयक डॉ. अनिल चिंधे ,कार्यशाळेचे समन्वयक डॉ.प्रमोद जावळे पाटील,प्रबंधक श्री पांडुरंग डावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



डॉ. प्रशांत अनभुले यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना सेट परीक्षेच्या एकूणच तयारी बाबत विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. सेट परीक्षेचे स्वरूप स्पष्ट करून परीक्षेची तयारी कशी करावयाची याबाबत मार्गदर्शन केले तसेच सेट नेट परीक्षा पास झाल्यानंतर उपलब्ध असणाऱ्या संधी त्यांनी विद्यार्थ्यांना उदाहरणासह स्पष्ट केल्या.आपल्या अध्यक्षीय समारोपात प्रोफेसर डॉ. संतोष उंदरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभ्यासामध्ये सातत्य ठेवणे गरजेचे आहे हे सांगून सेट नेट परीक्षा पास झाल्यानंतर करिअरच्या विविध संधी यावर प्रकाश टाकला .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो. डॉ. अरविंद आघाव यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.प्रमोद जावळे पाटील यांनी केले कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी रसायनशास्त्र विभागातील प्रा. प्रो. डॉ. महादेव साखरे, डॉ. अश्रूबा दन्ने, डॉ.योगेश भराटे, प्रा. संजीव सुरवसे व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.या कार्यशाळेस महाविद्यालयातील प्राध्यापक आणि पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मी गुढी बोलतेय...

हिंदू नूतन वर्षाच्या तुम्हा सर्वांना भरभरून शुभेच्छा आणि आपलं हे वर्ष सुखा-समाधानाचे, भरभराटीचे, निरामय, शांततापूर्ण आणि सर्वात महत्वाचं म्हणजे निरोगी जावो या सदिच्छा! या अशा शुभेच्छा तुम्हाला तुमचे आप्त स्वकीय, परिवारजन, मित्र मंडळी तसेच इतरांकडून मिळतीलच मात्र आज मी गुढी तुमच्याशी संवाद साधणार आहे. मला पण संवाद साधावासा वाटतोय म्हणजे संवाद साधणं हे किती महत्वाचं आहे हे तुमच्या लक्षात येईल. असो !

गुढी अर्थात् मांगल्याचं प्रतीक, वाईट शक्तीवर चांगल्या शक्तीचा नेहमी जय होतोच आणि तेव्हा मग उत्साहाने, हर्षोल्हासाने मिरवली जाते गुढी. पवित्रता, शुचिर्भूतता व्यक्त करणारी ही गुढी. आणि खरंतर ज्याच्या त्याच्या तार्किक बुद्धीप्रमाणेदेखील नक्कीच काहीतरी प्रतिकात्मक असणार ही गुढी त्यांच्यासाठी.

हिंदू नूतन वर्षातील हा सण म्हणजे आपल्या समृद्ध परंपरांचं, सोज्वळ सौस्कृतिकतेचं तसेच सामाजिक भान जपत असताना कौटुंबिकतेची महती वर्णन करणारा सण.. गुढी उभारताना यात अनेक रुढी परंपरा पाळल्या जातात. माझ्या मते उंच भरारी घेण्याची ऊर्जा देत असते गुढी.. गुढी अथांग, निरभ्र आभाळाकडे डोकावत असते मात्र ती जमिनीशी घट्ट रोवून असते. मनुष्याने पण मला वाटतं खूप मोठ्ठं व्हावं, इच्छित सारं काही मिळवावं मात्र पाय जमिनीवर असू द्यावे. गुढीला साखर गाठ देतात ते आयुष्यातील गोडवा टिकवून ठेवण्याचं सांगत असावे. कडूलिंबची डहाळी आयुरारोग्य सांभाळण्याचे सुचवत असावी. याच गुढीचे वर्णन करणारी ज्येष्ठ पुरोहिता सौ.



स्मिता आपटे लिखित सुंदर आरती मी माझ्या चॅनलला पोस्ट केली आहे ती गुढी उभारताना नक्की गाता येईल.

सणानिमित्त छान विचारांचं आदानप्रदान व्हावं, संस्कृती जपली जावी, रुसवे फुगवे दूर होऊन कुटुंब तसेच समाजामध्ये एकत्रिकरण व्हावं, हास्याचे कारंजे फुलावे आणि एकूणच खऱ्या अर्थानं समृद्धता यावी. अशा या मंगलदायक गुढीपाडव्याच्या आपणा सर्वांना भरभरून शुभेच्छा!

सौ कीर्ती देसाई